cmyk

## संपादकीय

### भाजपचा भाषा बदल!

लोकसभा निवडणुकीचे बिगूल अत्यंत आत्मविश्वासाने फुंकताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हंगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'अब की बार चारसौ पार'चा नारा दिला होता. निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीपूर्वीच विरोधकांना पुरते गार करून टाकण्याचा हा 'माईंड गेम' होता. त्यात भाजप सुरुवातीच्या टप्प्यात यशस्वी झाल्याचेही चित्र देशात दिसत होते. मात्र, आता निवडणुकीच्या तिस-या टप्प्याचे मतदान पार पडलेले असताना भाजपची व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा व प्रचाराची दिशा पुरती बदललेली पहायला मिळते आहे. आता स्वत: मोदीही 'चारसौ पार'चा उल्लेख करताना दिसत नाहीत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शरद पवार आज अंबाजोगाईत

बीड- महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ देशाचे माजी कृषीमंत्री शरद पवार यांची अंबाजोगाई येथे दिनांक ९ मे रोजी सायंकाळी चार वाजता जाहीर सभा होणार आहे. ही सभा अंबाजोगाई येथील मोंढा मैदानावर होणार असून यावेळी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, आ. संदीप क्षीरसागर यांच्यासह जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून शरद पवार यांची सभा यांच्यानंतर अंबाजोगाईतच होत असल्याने पवार नेमके काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२८ | गुरूवार दि.९ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# तुरदाळ, मुगदाळ, उडीद दाळीच्या किंमती वाढल्या शेतकऱ्याच्या खिशात पैसे पडण्याअगोदर होणार बोंबाबोंब!

## » शेतमालाचीच महागाई दिसते का?; सरकारसह नौकरदारांच्या पोटात दुखणार!





मुंबई । प्रतिनिधी

सध्या देशात लोकसभेच्या निवडणुका सुरु आहेत. या काळात महागाई वाढू नये असे सरकारच प्रयत्न सुरु आहेत. मात्र, काही वस्तूंच्या बातीतत हे होताना दिसत नाही. अनेक वस्तूंच्या किंमती वाढत आहेत. शेतमालाच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाली की केंद्र, राज्य सरकारसह नोकरदाराच्या पोटात दुखायला सुरुवात होते. भाववाढ होऊन शेतकऱ्याच्या खिशात पैसे पडण्याअगोदरच सर्वत्र बोंबाबोंब होताना दिसते. मात्र दुसरीकडे खत, बियाणे व जिवनावश्यक वस्तूंची झालेली भाववाढ कोणालाच दिसत नाही, हे मात्र दुर्दैव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वर्षभरात तुरीच्या डाळीत ३१ टक्क्यांची वाढ झालीय. तर मसूर डाळीच्या दरात १५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे बजट कोलमडले आहे. वर्षभरात मोठ्या प्रमाणात डाळींच्या दरात वाढ झाली आहे. याचा मोठा फटका सर्वसामान्य जनतेला बसत असल्याची ओरड आता सुरु झाली आहे. सध्या निवडणुकांचा काळ आहे. या काळात महागाई वाढू नये म्हणून सरकार प्रयत्न करत आहेत. जरम्यान, व्यापाऱ्यांकडून डाळीचा साठा झाला असल्याची भीती सरकारला वाटत आहे, त्यामुळेच बाजारात डाळीचा तुटवडा होत असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, बाजारात डाळींचा तुटवडा भासल्यामुळे मागणीप्रमाणे पुरवठा होत नाही. त्यामुळे दरात वाढ होताना दिसत आहे. बाजारात डाळींचा तुटवडा भासत आहे. त्यामुळे बाजारात डाळीचा पुरवठा वाढवण्याचे आव्हान सरकारपुढे आहे. अन्यथा आणखी दरात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांसह किरकोळ विक्रेत्यांनी डाळींच्या साठ्याबाबत नियमीत माहिती देण्याची ◂◂ पान २ वर

### ज्यांना दरवाढ वाटते त्यांनी दाळी खाऊ नयेत


तुर, उडिद, मुग ही पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना काय मेहनत करावी लागते, याची जाणीव बहुतेक सरकारसह नौकरदारांना नसावी. काही प्रमाणात भाव वाढले की, आरडाओरड सुरु होते. मग दाळींची भाववाढ झाल्याचे वाटत असेल तर अशा लोकांनी काही दिवस दाळी खाणे बंद केले तर काहीही बिघडणार नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### पेट्रोल, सोने, खते, बियाणांची महागाई दिसेना का?

सध्या सोने ७५ हजाराच्या जवळ पोहचले आहे. खतांसह बियाणांच्या किमती दरवर्षी वाढत आहेत. पेट्रोल, डिझेलच्या किमती आवाक्या बाहेर गेल्या आहेत. जसे शेतमालाच्या किमती आवाक्यात आणण्यासाठी सरकार प्रयत्न करते, तसेच पेट्रोल, डिझेल, सोने, चांदी, खते, बियाणे, व इतर वस्तूंच्या किमती आवाक्यात आणण्यासाठी प्रयत्न करायला हवे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

### दाळी आयात केल्या तर भाव पडणार

आपला देश इतर देशांकडून मोठ्या प्रमाणात डाळींची आयात देखील करतो. यामध्ये टांझानिया, मोझांबिक आणि म्यानमार या देशांचा समावेश आहे. या देशांतून दाळी आयात करण्याचा निर्णय सरकारने घेतला तर देशांतर्गत दाळीचे दर पडण्याची शक्यता आहे. त्याचा फटक शेतकऱ्यांना बसू शकतो.



## ११७७ मतदान केंद्रावर असणार तिसरा डोळा

बीड । प्रतिनिधी

**बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून यासाठी २३५५ मतदान केंद्रे तयार आहेत. मतदान केंद्रावर काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी यापैकी ५००/० टक्के असे ११७७ मतदान केंद्राचे थेट प्रक्षेपण म्हणजेच वेब कास्टिंग होणार आहे.**

बीड लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या विधानसभा मतदार संघात अनुक्रमे गेवराई-१९९, माजलगाव-१८९, बीड-१९१, आष्टी-२२०, केज-२०७ आणि परळी-१७१ असे एकुण ११७७ मतदान केंद्रावर वेब कास्टींग होणार आहे. या विधानसभा मतदारसंघात काही मतदान केंद्र हे संवेदनशील गटात मोडत असून अशा ठिकाणी वेब कास्टिंगची सुविधा असणार आहे. ◂◂ पान २ वर

## लोकसभा निवडणुकीनंतर पवार-ठाकरे गट काँग्रेसमध्ये विलीन होणार

### देवेंद्र फडणवीस यांची मोठी भविष्यवाणी; राज्याच्या राजकारणाला मिळणार कलाटणी





मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही अशक्य नाही, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण गेल्या साडेचार वर्षांपासूनच्या घडामोडी वारंवार या गोष्टीची जाणीव करुन देत आहेत. विशेष म्हणजे आता तर शरद पवार यांनी नुकतेच एका मुलाखतीत प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा विचार करु शकतात, असे वक्तव्य केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यानंतर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी 'इंडियन एक्सप्रेस'ला दिलेल्या मुलाखतीत प्रादेशिक पक्षांबाबात केलेल्या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. लोकसभा निवडणूक किंवा पुढील दोन वर्षात अनेक प्रादेशिक पक्ष हे काँग्रेस बरोबर जाणार किंवा त्यातील काही पक्ष हे काँग्रेसमध्ये ◂◂ पान २ वर

### शरद पवार काय म्हणाले..

लोकसभा निवडणूक किंवा पुढील दोन वर्षात अनेक प्रादेशिक पक्ष हे काँग्रेस बरोबर जाणार किंवा त्यातील काही पक्ष हे काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा विचार करतील, असे मोठे वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे. तुमचा पक्षही विलीन होईल का असे विचारल्यावर त्यांनी कोणतेही थेट उत्तर न देता काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकाच विचारधारेचे पक्ष असल्याचे सांगितले. मात्र याबाबतीत कुठलाही निर्णय सहकाऱ्यांच्या संमतीनेच होईल, आम्ही घाईने कुठलाही निर्णय घेणार नाही असेही पवार त्या मुलाखतीत म्हणाले. तर शरद पवार म्हणतात की, आगामी काळात छोटे पक्ष आमच्यासोबत येताना पाहायला मिळतील, असे सांगितले.

## सुप्रिया सुळेंना प्रदेशाध्यक्ष करा, मग पक्ष विलीन करतो

### शरद पवारांबाबत संजय निरुपम यांचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

**अनेक प्रादेशिक पक्ष येत्या काळात काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात असे भाकीत शरद पवारांनी केले आणि त्यानंतर राजकीय क्षेत्रातून विविध प्रतिक्रिया येऊ लागल्या. काँग्रेसचे माजी खासदार आणि सध्या शिंदे गटात असलेल्या संजय निरुपम यांनीही त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव या आधीच आला होता, पण सुप्रिया सुळेंना महाराष्ट्राच्या प्रदेशाध्यक्षा करा अशी अट शरद पवारांनी ठेवली होती असा वादा निरुपम यांनी केला. काँग्रेसने हा प्रस्ताव फेटाळला होता असेही त्यांनी सांगितले.**



संजय निरुपम म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रयत्न मागील काही वर्षांपासून सुरू आहे. काँग्रेसकडून पण या संदर्भात प्रस्ताव होता आणि शरद पवार साहेबांकडूनसुद्धा या संदर्भातील प्रस्ताव होता. या प्रस्तावामध्ये एक अट होती. शरद पवारांनी ही अट टाकली होती की जर राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन केलं तर सुप्रिया सुळे या महाराष्ट्र काँग्रेसच्या अध्यक्ष असतील. त्यावर काँग्रेस पक्षाने आक्षेप घेतला आणि हा प्रस्ताव काँग्रेसकडून नाकारण्यात आला.

### धर्मापुरीत वीज कोसळून एक ठार

परळी । प्रतिनिधी



परळी शहरात बुधवार दि.८ रोजी सायंकाळ ५ च्या सुमारास विजेच्या कडकडाट होऊन वीज अंगावर पडून तरुणांचा मृत्यू आल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील धर्मापुरी शिवारात घडली. मिळालेल्या माहितीनुसार ◂◂ पान २ वर

## दहा हजार कोटींच्या अॅम्ब्युलन्स घोटाळ्याची उच्च न्यायालयाकडून दखल

### राज्य सकारकडून मागवला खुलासा; आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या अडचणी वाढणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात १० हजार कोटींचा कथित अॅम्ब्युलन्स घोटाळा झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या कथित १० हजार कोटींच्या अॅम्ब्युलन्स घोटाळ्याप्रकरणी कोर्टानं शिंदे सरकारला दणका दिला आहे. उच्च न्यायालयानं याप्रकरणी राज्य सरकारकडून खुलासा मागितला आहे. त्यामुळे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या अडचणीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.**

बडे राजकारणी आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सेटिंग करत पुण्यातील सुमित फॅसिलिटीज आणि



बीव्हीजी या कंपन्यांनी १० हजार कोटी रुपयांचं अॅम्ब्युलन्स पुरवठ्याचं टेंडर घेतले. यासाठी नियम धाब्यावर बसवण्यात आले. टेंडरची मूळ किंमतही फुगवण्यात आली आहे. प्रकरणात पुण्यातील विकास लवांडे यांनी कोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारकडून खुलासा मागितला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमीत फॅसिलिटीज आणि बीव्हीजी कंपनीला ◂◂ पान २ वर

## विधानसभेलाही महायुती एकत्र निवडणुक लढणार?

### प्रफुल्ल पटेल यांचे सुचक विधान; आता कमी जागा घेतल्या विधानसभेला भरपाई करु

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या जागा वाटपात राष्ट्रवादीच्या वाट्याला कमी जागा आल्या. पण आता विधानसभेच्या जागावाटपात अधिकच्या जागा पदरात पाडून त्याची भरपाई करु, असे प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी मंगळवारी एका वृत्तपत्रास मुलाखत दिली. यावेळी ते बोलत होते. त्यामुळे विधानसभा निवडणुक भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे महायुती म्हणून एकत्र लढणार असल्याचे पटेलांच्या विधानावरुन दिसून येत आहे.



पटेल म्हणाले, लोकसभा निवडणुकीचा सारासार विचार करुन आम्ही कमी जागा घेतल्या आहेत. आम्ही जास्त जागांची मागणी केली होती, पण तिन्ही पक्षांमध्ये जागा वाटप करताना अडचणी येतात. हे विचारात घेऊन आम्ही कमी जागांवर समाधान मानले. लोकसभा निवडणुकीत ◂◂ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.७ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २.५० क्विंटल | २,२७१ | २,२७१ | २,२७१ |
| ज्वारी/हायब्रिड : ८५.५० क्विंटल | १,७०१ | ३,५०० | २,५३२ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ९.५० क्विंटल | ९,४०० | १०,७१० | १०,२६५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ६.५० क्विंटल | २,१६० | २,६०५ | २,४२१ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ९.५० क्विंटल | ४,५५० | ४,५५० | ४,५५० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,७७० | ५,७७० | ५,७७० |

# अक्षय्य तृतीयेपूर्वी सोने महागले!

## » चांदीच्या दरातही मोठी वाढ; ग्राहकांना बसणार मोठा फटका






मुंबई । प्रतिनिधी

**साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त म्हणजे अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त असतो. यादिवशी सोनं खरेदीला विशेष महत्त्व असते. पण अक्षय्य तृतीयेच्या आधीच सोनं आणि चांदी महागले आहे. अक्षय्य तृतीयेपूर्वीच सोने-चांदीच्या दरात जळगावच्या सुवर्ण नगरीत पुन्हा वाढ झाली आहे. त्यामुळे अक्षय्य तृतीयेला सोनं आणि चांदीची खरेदी करण्याच्या विचारात असलेल्या ग्राहकांना मोठा फटका बसला आहे.**

### अक्षय्य तृतीयेला सोनं का खरेदी करतात?

धार्मिक आणि पौराणिक मान्यतेनुसार हिंदू धर्मात अक्षय्य तृतीयेला विशेष महत्त्व आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी अक्षय्य तृतीया हा अर्धा मुहूर्त आहे. यादिवशी जर एखादं शुभ काम करायचं असेल तर त्यासाठी मुहूर्ताची गरज नाही. यादिवशी सोने-चांदी खरेदीपासून लग्न, शुभ कार्य. गृहप्रवेश आणि मुंडन, कार किंवा घर खरेदी करण्यात येते. हा दिवश खरेदीसाठी महत्त्वाचा मानला जातो. अक्षय्य तृतीयेपासून सत्ययुग आणि त्रेतायुग सुरू होतं अशी मान्यता आहे. अक्षय्य तृतीयेबद्दल अशी मान्यता आहे की, यादिवशी केलेल्या शुभ कार्याला चौपट फळ म्हणजे अक्षय प्राप्त होतं आणि त्या वस्तूची कधीही कमतरता पडत नाही. हिंदू धर्मात सोनं आणि दागिने हे लक्ष्मीचे भौतिक रुप मानले गेले आहे. त्यामुळे लक्ष्मीची आपल्या आणि आपल्या घरावर कायम कृपादृष्टी राहावी म्हणून यादिवशी सोनं खरेदीला महत्त्व आहे. एका पौराणिक आख्यायिकेच्या मान्यतेनुसार या दिवशी घेतलेले सोने परिधान केल्यास अकाली मृत्यू टळतो. दुसऱ्या एका कथेनुसार या दिवशी भगवान कुबेर यांना स्वर्गातील संपत्तीचं संरक्षण बनवण्यात आलं होतं. त्यामुळे अक्षय्य तृतीयाला सोने खरेदी करुन कुबेराची पूजा करण्यात येते. यामुळे घरात कायम सुख समृद्धी नांदेत, असा विश्वास आहे.

काही दिवसांपासून किरकोळ चढउतार होत असलेल्या चांदीच्या भावात प्रतिकिलो ११०० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे आता चांदीचा दर प्रतिकिलो ८२ हजार ७०० रुपयांवर पोहोचला आहे. तर सोन्याच्या दरात ३५० रुपयांची वाढ झाली आहे. यामुळे सोनं आता प्रतितोळा ७२ हजार ३०० रुपयांवर पोहोचले आहे. ◂◂ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भाजपचा भाषा बदल!

लोकसभा निवडणुकीचे बिगूल अत्यंत आत्मविश्वासाने फुंकताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हंगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'अब की बार चारसौ पार'चा नारा दिला होता. निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीपूर्वीच विरोधकांना पुरते गार करून टाकण्याचा हा 'माईंड गेम' होता. त्यात भाजप सुरुवातीच्या टप्प्यात यशस्वी झाल्याचेही चित्र देशात दिसत होते. मात्र, आता निवडणुकीच्या तिस-या टप्प्याचे मतदान पार पडलेले असताना भाजपची व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा व प्रचाराची दिशा पुरती बदललेली पहायला मिळते आहे. आता स्वत: मोदीही 'चारसौ पार'चा उल्लेख करताना दिसत नाहीत. तर त्यांनी आता काँग्रेस निवडून आल्यास अमूक होईल, तमूक होईल, अशी भीती मतदारांना घालण्यास सुरुवात केली आहे.

पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानानंतर भाजपची भाषाच बदलून गेली. हा चमत्कार कसा घडला? तर तो काँग्रेसने भाजपचा माईंडगेम अत्यंत आक्रमकपणे त्यांच्यावरच उलटवल्यामुळे घडला! 'चारसौ पार'च्या भाजपच्या माईंडगेमला त्यांच्याच पक्षातील वाचाळवीरांनी आपल्या बेताल वक्तव्याने सुरुंग लावला! कर्नाटकचे खासदार अनंत हेगडे, अयोध्येचे खासदार लल्लू सिंह, राजस्थानच्या ज्योती मिर्धा यांनी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा मिळाल्यास संविधान बदलण्याचा विचार असल्याचे वक्तव्य केले आणि काँग्रेसला भाजपला त्यांच्याच माईंडगेममध्ये अडकविण्याची आयती संधी मिळाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या संधीचा अत्यंत आक्रमकपणे वापर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान बदलण्यासाठी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा हव्या असल्याची तोफ डागली व भाजप पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलले जाईल, हा संदेश दलित, आदिवासी, मागासवर्गीय व तळागाळातील लोकांपर्यंत काँग्रेसने अत्यंत आक्रमकपणे पोहोचवला.

भाजप आपल्याच वाचाळवीरांमुळे आपल्याच जाळ्यात अडकला व मागच्या दहा वर्षांत प्रथमच बॅकफूटवर गेला. स्वत: मोदी, शहा, नड्डा, संघप्रमुख मोहन भागवत यांना संविधान बदलले जाणार नसल्याचे खुलासे करणे भाग पडले. यामुळे भाजप या निवडणुकीच्या प्रचाराचे जे नॅरेटिव्ह सेट करू इच्छित होता ते समीकरण पुरते बिघडून गेले. मतदानाच्या दुस-या टप्प्यानंतर आता त्याची प्रचिती येते आहे. भाजपच्या सेनापतीच्या प्रचारात आता विकसित भारताचा संकल्प हा तोंडी लावण्यापुरताच येतो आहे. मोदींना दहा वर्षांच्या आपल्या सत्ताकाळानंतरही आपली सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेसचे भूत लोकांसमोर उभे करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. काँग्रेसचे हे मोठे यशच मानायला हवे कारण मोदीपर्वात होणा-या निवडणुकीत प्रथमच काँग्रेसने भाजपला आपल्या मैदानावर खेळायला भाग पाडले आहे. यातूनच भाजपची प्रचाराची दिशा पुन्हा ध्रुवीकरणाच्या हुकमी मुद्यावर आली आहे. यातूनच काँग्रेसची सत्ता आली तर हिंदू समाजाची संपत्ती हिसकावून घेतली जाईल, त्याचे फेरवाटप करून ती मुस्लिम समाजात वाटली जाईल, ओबीसी आरक्षणात मुस्लिमांना वाटेकरी करण्यात येईल, असा प्रचार आता स्वत: मोदी यांनीच सुरू केला आहे.

थोडक्यात या चमत्काराचे श्रेय काँग्रेसला द्यावे लागेल. काँग्रेसने भाजपचा माईंडगेम त्यांच्यावरच उलटवून सर्वच भाजपविरोधी राजकीय पक्षांना संजीवनी बुटी मिळवून देणारा ठोस मुद्दा उपलब्ध करून दिला आहे. त्यातूनच भाजपची भाषा पुरती बदलली आहे आणि 'चारसौ पार'ची घोषणा भाजपच्या प्रचारातून पुरती हद्दपार झाली आहे. अर्थात भाजप एवढ्याने हार नक्कीच मानणार नाही. पक्ष संघटनेच्या प्रचंड ताकदीच्या जोरावर हरलेली बाजीही भाजप शेवटच्या क्षणी जिंकू शकतो. त्याचा प्रत्यय मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेलाच आहे. अनुकूल वातावरण असतानाही काँग्रेसला मध्य प्रदेशात भाजपला सत्तेतून दूर करता आले नाही. मात्र, यातून काँग्रेसने योग्य तो बोध घेतलेला दिसतो. त्यातूनच सध्या तरी काँग्रेसने भाजपला त्यांच्याच माईंडगेमच्या जाळ्यात अडकवून टाकले आहे व त्यातून सुटण्याची धडपड म्हणून मोदी व भाजपने आपल्याच 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास'या घोषणेला तिलांजली देऊन ध्रुवीकरणाच्या हुकमी अस्त्राचा वापर सुरू केला आहे. त्यातूनच आता तिस-या टप्प्याचे मतदान पार पडले असताना प्रचाराचा स्तर प्रचंड घसरला आहे.

भाजपने संविधान बदलाची बेताल बडबड करणा-यांना तिकिट नाकारून डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न केला असला तरी बृजभूषण यांच्या चिरंजीवांना तिकिट दिल्याने भाजपची सत्ता टिकविण्यासाठीची असहाय्यताही स्पष्ट होते आहे. तसेही भाजपला खरोखरच 'चारसौ पार'चा पल्ला गाठण्याचा आत्मविश्वास असता तर सुरत वा इंदूरमधून काँग्रेस उमेदवारांचे अपहरण करण्याचा मार्ग निवडावा लागला नसता. भाजप भलेही हे सगळे लोकशाही प्रक्रियेनुसार झाल्याचा दावा करत असला तरी तो खरा कोण मानणार? बहुमताचा आकडा गाठण्याची शाश्वती नसल्यानेच भाजपने हे तंत्र अवलंबिले आहे काय? असा प्रश्न या सगळ्या घटनाक्रमातून निर्माण होतो. भाजपच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी भाजपला नक्की मतदान करतील, हा भाजप नेत्यांचा दावा खरा मानला तरी या निवडणुकीत काँग्रेसने महागाई, बेरोजगारीच्या मुद्यावर सत्ताधारी भाजपची पुरती कोंडी केल्याचे चित्र तिस-या टप्प्यातील मतदानावेळीच स्पष्टपणे दिसते आहे. एकंदर या निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसने भाजपला सध्या तरी माईंडगेममध्ये पिछाडीवर टाकल्याचे स्पष्ट आहे आणि त्यातूनच भाजपची प्रचाराची भाषा पुरती बदलून गेल्याचे दिसते आहे. काँग्रेसने निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत माईंडगेममधील ही आघाडी कायम राखली तर ४ जूनला भाजपला सरकार स्थापनेसाठी जमवाजमवीची कसरत करावी लागत असल्याचे चित्र पहायला मिळू शकते. विरोधी पक्षांसाठी ही नक्कीच पर्वणी असेल! अर्थात उर्वरित पाच टप्प्यांत भाजप आणखी कोणते माईंडगेम खेळून विरोधकांवर प्रतिहल्ला चढवतो यावरही निकालाचे चित्र अवलंबून असणार आहे, हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही. तूर्त निवडणुकीच्या तिस-या टप्प्यापर्यंत काँग्रेसने भाजपवर माईंडगेममध्ये आघाडी घेतल्याने भाजपची भाषा बदलली आहे, हे मात्र निश्चित!

## पान १वरून...

### तुरदाळ, मुगदाळ, उडीद दाळीच्या

विनंती सरकारने केली आहे. आता दाळींच्या किमतीत वाढ झाल्याने त्याचा काही प्रकाणात का होईना शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शेतकरी आपल्या घरातील डाळ चांगला भाव मिळत असल्याने बाजारात आणतील, असे दिसते. मात्र भाव वाढले की, केंद्र सरकारसह नौकरदारांच्या पोटात दुखायला सुरुवात होईल. शेतकऱ्याच्या खिशात दोन पैसे पडण्याअगोदरच सर्वत्र बोंबाबोंब होऊन सरकार काही तरी वेगळा निर्णय घेईन आणि शेतकऱ्याच्या पदरी पुन्हा निराशाच येईल, असे दिसते.

-----------

### लोकसभा निवडणुकीनंतर पवार–

विलीन होण्याचा विचार करतील, असे मोठे वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबाबत सर्वात मोठे वक्तव्य केले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. 'पराभव जवळ दिसू लागल्याने शरद पवारांनी वक्तव्य केले आहे. लोकसभेनंतर शरद पवारांची पार्टी आणि ठाकरेंची पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे. बाळासाहेबांनी सांगितले होते, ज्यावेळेस काँग्रेसची युती करण्याची वेळ येईल त्यावेळेस मी माझं दुकान बंद करेन. या निवडणुकीनंतर त्यांची शिवसेना काँग्रेस बरोबर विलीन होणार आहे'', असे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी जळगावात आपल्या भाषणात केले.

-------------

### ११७७ मतदान केंद्रावर

यासह निश्चित झालेल्या ठिकाणी थेट प्रक्षेपणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सकाळी ५:३० वाजेपासून वाजेपासून ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वेब कास्टिंग होणार आहे. वेब कास्टिंगचे थेट प्रक्षेपण त्या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात नियंत्रण असणार आहे. तर एकूण सहाही विधानसभा मतदार संघाचे थेट प्रक्षेपण हे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या कक्षात दिसणार आहे. वेब कास्टिंग यंत्रणेद्वारे काही अनुचित प्रकार लक्षात आल्यास कायदा सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्या सतात्काळ त्या मतदान केंद्रावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल.

------------

### धर्मापुरीत वीज

परळी शहर व तालुक्यात बुधवार दि ८ रोजी सायंकाळी ५ च्या दरम्यान ढग दाटून येऊन विजेचा कडकडाट होऊन पावसाच्या सरी पडल्या. याच दरम्यान तालुक्यातील धर्मापुरी शिवारात फवारणी काम करत असलेल्या पांडुरंग ज्ञानोबा फड आणि त्यांची आई हे झाडाखाली येऊन थांबले असता वीज पडून पांडुरंग ज्ञानोबा फड या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. पितृछत्र हरवलेल्या कुटूंबाच्या पांडुरंग हा २३ वर्षीय युवक हाच कर्ता पुरुष आज निसर्गाच्या तावडीत सापडून गतप्राण झाल्याने धर्मापुरी गावात शोककळा पसरली आहे.

--------------

### विधानसभेलाही महायुती

राष्ट्रवादीने चार जागांवर उमेदवार दिले आहेत. महादेव जानकरांची जागा आम्ही तिन्ही पक्षांचा विचार करुन सोडली, असेही पटेल यांनी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या जागा वाटपात राष्ट्रवादीच्या वाट्याला कमी जागा आल्या. पण आता विधानसभेच्या जागावाटपात अधिकच्या जागा पदरात पाडून त्याची भरपाई करु, असे प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले आहे. त्यामुळे लोकसभाप्रमाणेच विधानसभाही महायुती एकत्र लढणार असल्याचे दिसते. पटेल यांचे विधानसभा निवडणुकीतील जागांबाबत केलेले विधान बरेच काही सांगून जाते.

----------------

### अक्षय्य तृतीयेपूर्वी

पंचांगानुसार वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीया तिथी शुक्रवार १० मे पहाटे ४.१७ वाजेपासून शनिवारी ११ मे पहाटे ०२:५० वाजेपर्यंत असणार आहे. उदय तिथीनुसार शुक्रवार १० मे अक्षय्य तृतीया साजरी करण्यात येणार आहे.

-----------

### दहा हजार कोटींच्या ॲम्ब्युलन्स

१० हजार कोटींचं ॲम्ब्युलन्स पुरवठ्याचं टेंडर दिलं. टेंडरचे नियम बदलण्यासाठी आरोग्य खात्याचे कमिशनर धीरज कुमार यांच्यावर दबाव टाकण्यात आला, असं सांगितलं जात आहे. टेंडरची मूळ किंमत दुपटीने फुगवण्यात आली. 'सुमित' आणि 'बीव्हीजी'च्या फायद्यासाठी प्रीबिड मीटिंग देखील घेतली गेली नाही. याशिवाय टेंडरच्या फाईलमध्ये खाडाखोड करण्यात आल्याचा आरोप आहे. घोटाळ्यावरून पुण्यातील विकास लवांडे यांची हायकोर्टात याचिका दाखल केली. त्यानंतर आता कोर्टाने आता राज्य सरकारकडून स्पष्टीकरण मागितलं आहे. न्यायालयानेच दखल घेतल्याने आरोग मंत्री तानाजी सावंत यांच्या अडचणीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

----------

# विकासाच्या नावाखाली फक्त धुळफेक-माजीमंत्री सुरेश नवले

## बजरंग सोनवणेंसाठी सुरेश नवले यांच्या ठिकठिकाणी सभा व कॉर्नर बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड लोकसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी अनेक जण भेटीगाठी दौरे करत असून यात माजी मंत्री सुरेश नवले हे सुद्धा चांगले काम करत आहेत. बीड मतदार भवानवाडी, वस्ती, हिवरापाडी, शिवनी फाटा वस्ती, वोडका राजुरी फाटा, मुळे वस्ती, जरूर, हाजीपुर, गाजीपुर, तरडगव्हाण, आर्वी, उमरी, दहिफळ, पिंपरी तांडा, शहरातील अनेक भागात प्रा. सुरेश नवले यांनी गाठीभेटी घेत अनेक सभा घेतल्या. यावेळी बोलताना नवले यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. सत्ताधार्यांनी बीड जिल्हा भकास केल्याचे मत सुद्धा माजीमंत्री सुरेश नवले यांनी व्यक्त केले आहे. सुरेश नवले यांच्यामुळे बीड मतदार संघात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.**

सध्या सर्वत्र लोकसभेचे वातावरण निर्माण झाले असून बीड लोकसभेत कोण बाजी मारणार याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे. बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी माजीमंत्री सुरेश नवले यांनी झंझावाती दौरा सुरु केला आहे. त्यांनी शहरीभागासह ग्रामिण भागात बैठका घेत अनेक सभा घेतल्या आहेत. सत्ताधार्यांनी विकासाच्या नावाखाली धुळफेक केल्याचे मत माजीमंत्री प्रा.सुरेश नवले यांनी व्यक्त केले आहे. यासह भाजपाने देशात केलेली महागाई यात गॅस,



पेट्रोल, किराणा सामानाचे वाढलेले दर, बांधकामांचे दर यासह इतर महत्वाच्या विषयांना त्यांनी हात घातला. सर्व सामान्यांना होणार्या अडचणींच्या अनुषंगाने माजीमंत्री सुरेश नवले बोलत असल्यामुळे लोकांना त्या बाबी आवडत आहेत. यामुळे बजरंग सोनवणे यांना वाढता पाठिंबा मिळत आहे. माजी मंत्री सुरेश नवले यांनी गाठीभेट घेत केलेल्या सभांमुळे बीड मतदार संघात महाविकास आघाडीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी ग्राम व शहरातील मगर श्रीकृष्णा, आप्पासाहेब उगले, विकाय मगर, विशाल उगले, गणेश उगले, युवराज मगर, मधुकर मगर, लत्तमण मगर, प्रमेश्वर मगर, सुरेश उगले, गोविंद उगले, उद्धव उगले, श्रीमंत मगर, बंडू मगर, नाययण उगले, अविनाश रनमेल, विशंभर मगर, पोपट मगर, बाळू मगर, अभिमान उगले, राजद्र उगने, उगल बाजीराव, भारत उगले, नानाभाऊ उगले, सुरेश उगले, श्रीमराव चव्हाण, भीमराव उगल, प्रवीन उगल, मंगेश उगले, श्रीराम उगाये, सुनील उगना, प्रल्हाद चव्हाण, उगल नारायण, महादेव कुडाळकर, महादेव कुंदलकर, ज्ञानदेव उगले, सखाराम उगल, सुरेश उगले, जालदर उगल, कल्याण उगाण, माणिक उगल, श्रीकांत उगले, नामदेव लाडगे, जनार्धन उगले, सोमनाथ उगले, अभिमान चव्हाण, किशोर उगले, सूरश उगले, अभिमान चव्हाण, किशोर उगले

# वरळीतून आदित्य ठाकरेंनी निवडणूक लढवून दाखवावी–ॲड.सदावर्ते

**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीचे राज्यातील तीन टप्पे पार पडल्यांनंतर आता विधानसभेचे पडघम वाजू लागल्याचं दिसतंय. राज्याच्या सहकार खात्याने ॲड. गुणरत्न सदावर्ते आणि त्यांच्या पत्नी जयश्री पाटील यांचं एसटी बँकेचं संचालकपद रद्द केल्यानंतर सदावर्तेंनी आता थेट आदित्य ठाकरेंना आव्हान दिलंय. येणाऱ्या विधानसभेमध्ये मी आदित्य ठाकरे यांना चॅलेंज देतो, येणाऱ्या वरळी विधानसभेमध्ये त्यांनी डिपॉजिट जप्त करून दाखवावं. आदित्य ठाकरेंचं डिपॉजिट जप्त नाही केलं तर मी मिशा ठेवणार नाही असं थेट आव्हान ॲड. गुणरत्न सदावर्तेंनी दिलंय.**

ॲड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, तुम्ही वीर जिजामाता नगरमध्ये येऊन पाहा, सदावर्तेच्या मागे किती शक्ती आहे. उद्धव ठाकरेंच्यामागे एकही माणूस दिसणार नाही. वरळीमध्ये अंतर्गत खूप काम सुरू आहे, आदित्यच्या पायाखालची वाळू सरकली आहे. वरळीतून आदित्य ठाकरे यांनी निवडणूक लढून दाखवावी. पहिल्या २५ टक्के मतमोजणीतच आदित्य ठाकरे रडत रडत घरी जातील. त्यांचं डिपॉजिट जप्त करणार. आमचं संचालक पद रद्द केलेलं नाही, सर्व बातम्या खोट्या असून त्या बातमीचा निषेध करतो असं गुणरत्न सदावर्ते म्हणाले. तक्रारदार संदीप शिंदे हे शरद पवारांच्या ताटाखालचं मांजर असल्याचा आरोपही त्यांनी केला. ॲड. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, सदावर्ते आणि जयश्री पाटील यांची बातमी देत त्या संदीप शिंदेने पत्रकारांना उल्लू बनवलं. शरद पवार यांच्या ताटाखालचा तो माणूस आहे.

# बुधवारपर्यंत १०६९ टपाली मतदान

बीड । प्रतिनिधी

रविवारपासून सुरू झालेले टपाली मतदान आज बुधवार रोजी पर्यंत १०६९ इतक्या नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. याअंतर्गत ८ सर्विस मतदार, २ गृह मतदरांनी आणि सुविधा केंद्रतून पोस्टल बॅलेटद्वारे ८ मतदारांनी मतदान केले. बुधवारी ०८ सर्विस मतदारांनी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान केले. यासह ८५ वयोगटाच्या अधिकचे आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये ८५ वयोगटाच्या अधिक ०१ मतदाराने तर ०१ मतदार हे दिव्यांग होते. असे एकूण ०२ मतदारांनी गृह मतदान केले. आष्टी विधानसभा मतदारसंघातील सुविधा केंद्रात ८ मतदारांनी पोस्टल बॅलेट द्वारे मतदान केले. रविवारपासून टपाली मतदानाला सुरूवात झाली असून आजपर्यंत १०६९ मतदारांनी मतदान केले.


# भ्रामक जाहिरातींसाठी सेलिब्रिटीही जबाबदार-सर्वोच्च न्यायालय

## प्रिंट मीडियासाठी महिनाभरात पोर्टल स्थापन करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली । वृतंस्था**

**कुठल्याही उत्पादनांच्या जाहिराती या खोट्या व भ्रामक आढळल्यास त्यासाठी सेलीब्रिटीज आणि प्रसारमाध्यमांवर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती जबाबदार असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ७) दिला आहे.**

योगगुरू बाबा रामदेव यांच्या पतंजली आयुर्वेद संस्थेने खोट्या व भ्रामक जाहिराती प्रसिद्ध केल्याच्या



विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरु आहे. कुठल्याही जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी ब्रॉडकास्टर्स कंपनीने स्वतः प्रमाणित केलेला अर्ज सादर करावा, ज्यामध्ये आम्ही जाहिरातींच्या नियम व अटींचे पालन करतो, असे नमूद केले पाहिजे, असे न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले. टीव्ही ब्रॉडकास्टर्स त्यांच्या ब्रॉडकास्ट सर्व्हिस पोर्टलवर घोषणा अपलोड करावी लागेल. प्रिंट मीडियासाठी येत्या चार आठवड्यात एक पोर्टल स्थापन करा, असे निर्देशही न्यायालयाने दिले. भ्रामक जाहिरातींसंदर्भात असलेल्या २०२२ च्या दिशानिर्देशांचा उल्लेख सर्वोच्च न्यायालयाने यावेळी केला. कुठल्याही व्यक्तीने जाहिरात प्रसिद्ध केल्यास त्या उत्पादनाच्या सेवेची संपूर्ण माहिती त्या व्यक्तीला असणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. जाहिरातीविषयी ग्राहकांना तक्रार दाखल करता येण्यासाठी प्रक्रिया तयार करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

**खोट्या व भ्रामक जाहिराती प्रसिद्ध करणाऱ्या कंपन्याविरुद्ध औषधी व सौंदर्यप्रसाधन कायदा १९४५ च्या कलम १७० अंतर्गत कारवाई करण्यापासून राज्य व केंद्रशासित प्रदेशातील आयुष अधिकाऱ्यांना का रोखण्यात आले, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारला विचारला.**

# बीड लोकसभा मतदारसंघात विकासाचं अस्त्र ठरू लागलं प्रभावी, जातीपातीचं शस्त्र होवु लागलंय निकामी, पंकजा वादळाने घेरला जिल्हा!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड लोकसभा मतदारसंघात निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्याकडे वळत असुन तिरंगी लढतीच्या सामन्यात विरोधकांनी हाती घेतलेले जातीच्या राजकारणाचं अस्त्र खर्या अर्थाने निकामी होताना दिसतंय. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी सुरूवातीपासुन मांडलेली सकारात्मक राजकारणाची भुमिका तथा विकासाचं राजकारण यालाच आता खर्या अर्थाने प्रतिसाद वाढला असुन सद्यस्थितीत पंकजा वादळाने संपुर्ण मतदारसंघ घेरला दिसल्याचे चित्र पुढे येवु लागलं. किसान पुत्राची शेती नेमकी कशाची?हे पोलीस कारवाईत उघडकीस आल्यापासुन या निवडणुकीत जातीपातीचा आधार घेण्याचा प्रयत्न करणार्या उमेदवाराचा खरा चेहराच समोर आला. ज्यामुळे सामान्य माणसाला पंकजाताईसारखं नेतृत्व आपण दिल्लीला पाठवलं तर जिल्ह्यांच भाग्य निश्चित उजळु शकतं. देशाचे पंतप्रधान बेटी पंकजा हे शब्द उच्चारताच तेव्हा भविष्यात हीच लेक त्यांची वाढलेली ताकद विकासाच्या पार्श्वभुमीवर जमेची बाजु याची खात्री लोकांना पटली.**

या मतदारसंघात तिरंगी लढतीचा सामना होत असताना वंचित पक्षाकडून निवडणुक लढवणारे अशोक हिंगे यांनी देखील सर्वत्र आघाडी घेतलेली दिसते. लोक खर्या अर्थाने बजरंग सोनवणे आणि अशोक हिंगे यांच्यात देखील तुलना करताना दिसतात. ज्या अशोक हिंगेंनी मराठा आरक्षणासाठी मागच्या पंधरा-वीस वर्षात अनेक आंदोलने, उपोषणे रस्त्यावर उतरून संघर्ष केला. तर दुसर्या बाजुने महाविकास आघाडीकडून निवडणुक लढवणारे बजरंग सोनवणे आरक्षणाच्या प्रश्नावर लोकांना कधीही रस्त्यावर दिसले नाहीत. बर्यापैकी हा विचार पुढे येताना दिसत असल्याने अशोक हिंगे यांचे पाठबळ देखील वाढलेले लक्षात येते. विशेष म्हणजे



महायुतीची उमेदवारी जाहिर झाल्यापासुन पंकजाताई मुंडेंनी या मतदारसंघात आष्टी, पाटोदा, शिरूर, बीड, गेवराई, वडवणी,माजलगाव, केज, परळी, अंबाजोगाई, धारूर तालुक्याचा झंझावती दौरा करत मतदार जनतेच्या समोर जावुन त्यांनी फक्त विकासाची भुमिका मांडली. पाच वर्षे पालकमंत्री म्हणुन मी केलेले काम आणि आता भविष्यात मला केवळ विकासाचं राजकारण, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पंकजाताई केवळ निवडणुकीला सामोरे जातानाच आश्वासन देवु लागल्या असं नव्हे कारण या बीड जिल्ह्याचा कायापालट राज्याच्या सत्तेत मंत्री असताना त्यांनी करूनच दाखवलेला आहे. पाच वर्षात पालकमंत्री म्हणुन २५ हजार कोटीपेक्षा अधिक योजना त्यांनी बीड जिल्ह्यातल्या गावकुसापर्यंत तांडे, वस्ती, खेडी शहरात राबवुन दाखवल्या. जिल्ह्यात असं एक गाव नाही जिथे पंकजाताईचं काम नाही. निवडणुक प्रचारात त्या जेव्हा फिरतात त्यावेळी मतदार माय-बाप सांगतात की, ताई तुमच्यामुळे आमच्या गावाला ही योजना आली. यापेक्षा राजकिय नेतृत्वाला दुसरी साक्ष कोणतीच असु शकत नाही. जिल्हावासियांनी पंकजाताईचं राजकारण एकुण जवळुन पाहिलेले आहे. त्यांच्या पोटात कुणाविषयी कधीही पाप नसतं, सुडाचं राजकारण त्या कधी करत नाहीत. सर्वसमावेशक राजकारण हा त्यांचा मानवतावादी धर्म आहे. माणसं आडवा, त्यांची जिरवा या प्रयोगापासुन स्वत:ला नेहमीच त्यांनी दुर ठेवलं. समाजातील वंचित,उपेक्षित, दीनदलित, कष्टकरी माय-बाप जनतेच्यासाठी सेवक म्हणुन रात्रंदिवस त्यांनी केलेले काम याचि देहि, याचि डोळा आपल्या जिल्ह्यातील लोकांना दिसते आहे. त्यांच्याकडे विकासाचं व्हिजन असुन आपण मतदारांनी कुठल्याही परिस्थितीत त्यांनाच निवडुन द्यायला हवं अशा भावना सामान्य जनतेच्या मनात पुढे आल्याने ही निवडणुक खर्या अर्थाने जातीच्या मुद्याहुन विकासाच्या मुद्यावर अंतिम टप्यात दिसुन आले. म्हणुन तिरंगी लढतीत पंकजा नावाचं वादळ संपुर्ण जिल्ह्यात पसरलं असुन कमळाची हवा तयार झाल्याने आता जातीपातीच्या पलीकडे जावुन लोक विकासाच्या राजकारणाकडे पाहु लागले. परिणामी पंकजाताईला पाच वर्षे संधी देण्याचा जणु काही निर्धारच सामान्य लोकांनी केल्याचे लक्षात जिल्हाभरात येवु लागलं. विकासाचं अस्त्र आता प्रभावी ठरत असल्याने जातीपातीचं शस्त्र निकामी होताना नव्हे तर निवळताना दिसायला लागलंय.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ९ मे २०२४


## दिलखुलास कार्यक्रमात जिल्हाधिकाऱ्यांची मुलाखत



मुंबई : 'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज' याविषयी बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांची मुलाखत घेण्यात आली आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात, शुक्रवार १० मे २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत ही मुलाखत प्रसारित होणार आहे. पत्रकार अतुल कुलकर्णी यांनी ही मुलाखत घेतली आहे.

बीड जिल्ह्यात असलेले लोकसभा निवडणूक मतदार संघ, लोकसभा निवडणुकीचे कामकाज पार पडण्यासाठी सुरू असलेली कार्यवाही, मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रांवर करण्यात आलेली तयारी, मतदार जनजागृती उपक्रम, कायदा व सुव्यवस्थेबाबतचे नियोजन, सर्व घटकातील मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधा याबाबत बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी या मुलाखतीत माहिती दिली आहे.

# बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस निरीक्षकाला लुटले!

## हातातील अंगठ्या, रोख रक्कम असा ६६ हजारांचा मुद्देमाल लंपास

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात चोरट्यांचे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. बस, बसस्थानक येथील चोऱ्यांसह घरफोड्याही वाढल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी अंबाजोगाईत मोदींच्या सभेच्या अनुषंगाने तगडा बंदोबस्त असताना चोरट्यांनी चक्क एटीएम मशीन पळविले, त्यानंतर बीडमध्ये मोदींच्या बंदोबस्तासाठी आलेल्या पोलीस निरीक्षकाला पकडुन हातातील अंगठ्या, रोख रक्कम असा ऐवज लंपास केला आहे. या घटनांमुळे चोरट्यांची जिल्ह्यात दहशत वाढल्याचे दिसून येत आहे.



कृष्णा उत्तमराव हिस्वनकर (वय ५६ रा.शहानुरवाडी, छत्रपती संभाजीनगर ह.मु. बिंदुसरा पोलिस अधिकारी कॉलनी, बीड) असे लुटलेल्या पोलिस निरीक्षकांचे नाव आहे. हिस्वनकर हे छत्रपती संभाजीनगर येथे एसआरपीएफ ग्रुप-१४ येथे बिनतारी संदेश विभागात कार्यरत आहेत. सध्या लोकसभा निवडणूक असल्याने ते चार दिवसांपासून बीडमध्ये बंदोबस्तासाठी आलेले आहेत. रविवार, ५ मे रोजी रात्री साडे अकरा वाजता हिस्वनकर हे जिल्हा रूग्णालयाच्या बाजुच्या रस्त्याने बिंदुसरा कॉलनीकडे जात होते. याचवेळी दुचाकीवरून दोघे आले. त्यातील एकाने हिस्वनकर यांना पकडून ठेवले तर दुसऱ्याने त्यांच्या हातातील दोन अंगठ्या, रोख पाच हजार रूपये असा ६६ हजार रूपयांचा मुद्देमाल घेऊन धुम ठोकली. त्यानंतर ७ मे रोजी बीड शहर पोलिस ठाणे गाठत हिस्वनकर यांनी अज्ञात दोन चोरट्यांविरोधात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा नोंद झाला आहे.

### स्थानिक गुन्हे शाखा, बीड शहर पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू

पोलीस निरीक्षकास लुटल्या प्रकरणी गुन्हा दाखल होताच बीड शहर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखा चोरट्यांच्या शोधात कामाला लागली आहे. परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले जात असून तांत्रिक पद्धतीने तपास सुरू आहे. लवकरच आरोपींना जेरबंद केले जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली.

## शेतकऱ्याला देशोधडीला लावणाऱ्या भाजपला पराभूत करा -भाई ॲड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने काल दी.७ मे रोजी धारूर, वडवणी तालुक्यातील धुनकवड नं २, उपळीवस्ती, उपळी, कुप्पा, केसापुरी परभणी, ढोरवाडी, लक्ष्मीपूर, कान्हापुर, सवाशेवस्ती, हिवरगव्हाण, हिवरगव्हाण फाटा, पहाडी पारगाव, चिंचवन आदी गावात मतदार सवांद दौरा करण्यात आला यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी मतदारांशी संवाद साधताना शेतकऱ्याला देशोधडीला लावणाऱ्या भाजपला पराभूत करा आणि इंडिया आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या तुतारी वाजवणारा माणूस चिन्हा समोरील बटन दाबून मताधिक्य देण्याची विनंती केली, यावेळी बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची सर्वच ग्रामस्थांनी हमी दिली, त्यावेळी बाबाराया भोसले, विशाल रोटे, गणेश काळे,दीपक डाके यांच्यासह आदि कार्कर्त्यांची विशेष उपस्थिती होती.



## मोफत आणि सवलतीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांची अवहेलना थांबेल का? -जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात शासनाने एस टी च्या तिकीट दरात महीलांना ५०% सवलत तर ७५ वर्षं पुर्ण करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास लागु केल्याने एस टी तुन प्रवास करताना महीला आणि ज्येष्ठ मोठ्या प्रमाणात दिसतात. त्यामुळे खच्च भरलेल्या एस टीत चालक आणि वाहक यांच्या रोषाचा केंद्रबिंदूच ही लाभार्थी असतात. महीलांना अर्धं टिकीट केलं म्हणून वर तोंड करून निघतात यांना काही काम नाही. मोकाट कुठल्या.... तर ज्येष्ठांना आत्ता बसावं ना एका जाग्यावर, काय गरज हिंडायची. सुनानी हाकल वाटत. असे टोमणे कंडक्टर मारत असताना, तरूण वर्ग ही हासुन दाद देत.. आले फुकटे द्या त्यांना बसायला सीट. आपण फुल टिकीट वाले जाऊ उभ्याने असं म्हणुन त्यांना अवमानित करतांना दिसतात. खरचच ही मंडळी मोकाट आहे? काम नसताना फिरतात ? सर्वसाधारण ही मंडळी गरीब आणि मध्यमवर्गीय असतात. कधी औषधोपचारासाठी कधी कोर्टकचेरीच्या कामासाठी तर कधी घरापासून दुर असणाऱ्या मुला मुलींना नातवांना काही गोडधोड रानचा मेवा घेऊन भेटायला येतात. काहीजण तेव्हढीच बचत व्हावी म्हणून बाजारहाट किंवा इतर कामे आपणहुन स्विकारत उतारवयात कुटुंबातील जवाबदारी उचलण्याचा प्रयत्न करतात. अशा ज्येष्ठांची आणि आईबहीणीची टिंगल टवाळी उडवणे एस टी कर्मचारी आणि तरूण वर्गाला शोभते का? यात कधी आपला बाप आई बहीण ही असते हे विसरता कामा नये. जेव्हा एस टी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी संप पुकारला तेंव्हा तुमची बाजु मांडणारी हीच मंडळी होती ना तेंव्हा प्रशासनाने दिलेल्या सवलतीचा लाभ घेणाऱ्या मायबापांना असं अपमानीत करु नका हीच अपेक्षा.





**बीड : लोकसभा मतदार संघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून घरोघरी मतदार चिट्ठी वाटपाची कार्यवाही सुरू आहे. या अंतर्गत यादी भाग क्रमांक १९४ चे बी. एल. ओ. विलास वामन वीर आणि बीड तहसिल कार्यालयातील कर्मचारी अनिल विद्यागर यांनी बीड जिल्हाधिकारी दिपा विश्वास मुधोळ- मुंढे यांना त्यांच्या घरी जाऊन मतदार माहिती चिट्ठी वाटप केली.**

## युवतींनी घेतले स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण : लाठी-काठी,तलवार बाजी, कराटे प्रकारातही मुलींचा पंधरा वर्षापासून सहभाग

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था, संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी तसेच श्रीमती कमल खुरसाळे न्यास आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिरात यावर्षी०१ ते०८ मे या कालावधीत जवळपास पावणेतीनशे मुलींनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले त्यांना बीदर (कर्नाटक) येथील राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक चंद्रकांत बलाढये, बापू सोळुंके, अंकुश गायकवाड, अकबर पठाण,योग प्रशिक्षक दीपक देवळे मंदाकिनी गित्ते यांनी मार्गदर्शन केले.



सकाळी राष्ट्रगीत, योगासन आणि प्रशिक्षण तसेच प्रबोधनपर विविध मान्यवरांची व्याख्याने झाली या वर्षी शिबिराचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, स्त्रीरोग तज्ञ डॉ.शुभदा लोहिया, राष्ट्रीय हॉकीपटू श्रेया पवार, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक यांच्या उपस्थितीत शुभारंभ झाला.

पंधरा वर्षा पासून शहरात सुरू असलेल्या या आत्मभान शिबिरामुळे स्वसंरक्षणाचा पाठ मुलींना या पुर्वी मिळाला आणि पुढेही मिळेल प्रामुख्याने यातूनच अन्यायाविरोधात प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण होत असते लाठीकाठी प्रशिक्षणाचा फायदा भावी आयुष्यात निश्चितच मुलींना होईल यासाठीच योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून हे शिबीर घेतले जाते. शिबिरातील सर्व उपक्रम चांगले असतात व यापुर्वीही झाले

योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक तथा योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक भीमाशंकर शेटे म्हणाले की, समाजात महिलावर होणारे अत्याचार पाहता अशी शिबिरे व्हायला पाहिजेत अंबाजोगाई व परिसरातील युवतींना स्व संरक्षणासाठी या शिबिराच्या माध्यमातून आम्ही गेल्या पंधरा वर्षापासून प्रशिक्षण देतोय या शिबिरात कुठल्याही शाळा महाविद्यालयातील मुली सहभागी होतात नवचैतन्याने ऊर्जा निर्माण करण्याचे काम शिबिराच्या माध्यमातून होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आठ दिवस चालणाऱ्या महिला आत्मभान शिबीरासाठी योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे सदस्य, योगेश्वरी शिक्षण संस्थेतील विविध विभागाचे कर्मचारी परीश्रम घेत असतात.

## हमाल मापाडी युनियनने पंकजाताईना जाहीर पाठिंबा व्यक्त करत भरघोस मतांनी निवडूण आणण्याचा केला निर्धार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतशी ती रंगतदार आणि चुरशीची होतांना दिसून येत आहे. लोकसभा बीड च्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अंबाजोगाई शहरात येऊन गेले. अनेक ठिकाणाहून पंकजा मुंडे यांना वाढता पाठिंबा मिळताना दिसून येत आहे. याचाच प्रत्यय अंबाजोगाई मोंढा येथील हमाल मापाडी युनियन च्या वतीने पंकजा मुंडे यांना जाहीर पाठिंबा व्यक्त करत त्यांना भरगोस मतांनी निवडणूक आणण्याचा निर्धार देखील व्यक्त करण्यात आला.

बुधवार दि ८ रोजी हमाल मापाडी युनियनची बैठक घेऊन हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या बैठकीत अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण,माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, हमाल मापाडी युनियनचे अध्यक्ष बाळासाहेब आदमाणे युवानेते सचिन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक संपन्न झाली. याप्रसंगी बैठकीत उपस्थित मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले.

बैठकीत बोलताना राजकिशोर मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना ,तसेच भाजपा या तीनही पक्षाची महायुती निर्माण झाली आहे. महायुतीच्या आघाडीमुळे आणि बीड लोकसभेची जागा ही भाजपाला सुटल्याने आपणास ताकतीने पंकजा मुंडे यांना भरगोस मतांनी निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावयाचे असल्याचे राजकिशोर मोदि यांनी या बैठकीत सांगितले आहे. त्याचबरोबरअंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून हमाल मापाडीसाठी त्यांच्या वस्तीत योग्य त्या सुख सुविधा आणि मूलभूत गरजा मिळवून देण्यासाठी मी सदैव तत्पर व सोबत असेन असेही राजकिशोर मोदी यांनी आश्वाशीत केले.

बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांनी देखील याप्रसंगी आपले विचार मांडले. जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून अत्याधुनिक व सर्व सोयीसुविधा युक्त असे हमाल भवन उभा करून देण्यात येईल तसेच हमाल मापाडी यांचा आरोग्य विमा काढून हमाल बांधव व त्यांच्या कुटुंबाला संरक्षित करण्यात येईल असे ॲड राजेश्वर चव्हाण यांनी नमूद केले. हमालांची येणाऱ्या पिढीसाठी शिक्षणासाठी विशेष काळजी घेऊ त्याचबरोबर मार्केट यार्ड मध्ये काम करणाऱ्या सर्व हमालांना बॅच, बिल्ले देऊन अधिकृत करण्यावर भर दिला जाईल . नवीन नावनोंदणीसाठी अंबाजोगाई हमाल मापाडी युनियनचे शिफारस पत्र असणे बंधनकारक करून बोगस नावे कमी करून खऱ्या श्रमिकांचा प्रतिनिधी नेमला जाईल असे आश्वासन याप्रसंगी बाजार समितीचे अध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांनी उपस्थित सर्व हमाल बांधवाना दिले. सदरील बैठक ही शेकडो हमाल मापाडी बांधवांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली.या बैठकीचे संचलन जलालभाई गवळी यांनी तर आभार अकबर गवळी यांनी केले. यासाठी युनियनचे अध्यक्ष बाळासाहेब आदमाणे यांच्यासह जीवन गव्हाणे, अकबर पप्पूवाले,बाळू धबडगे, विजय आदमाणे, सचिन पायके, सुनील ढगे, सुनील दोनगहू, रजाक पप्पूवाले,चांद पप्पूवाले,अक्षय आदमाणे, मनोज सोनवणे यांच्यासह अनेकजनांनी अथक परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

### मुस्लिम समाजाला मस्ती

तडा निर्माण व्हावा यासाठी बेताल वक्तव्य केलेले असून येणाऱ्या निवडणुकीमध्ये ज्या महायुतीच्या नेत्यांना उमेदवारांना सत्तेची मस्ती चढलेली आहे अशा माहायुती च्या नेत्यांची मस्ती मतदार आपल्या मतदानाच्या अधिकाराद्वारे उतरणार आहे भाजपाच्या व महायुतीच्या नेत्यांना आपला जनाधार गमावल्यामुळे अशी बेताल वक्तव्य करून दोन समाजात तेढ निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजण्याचा ते अयशस्वी प्रयत्न करीत आहेत परंतु जागरूक मतदार त्यांच्या आशा खोट्या प्रचारांना वलगणांना भिक घालणार नसून मुस्लिम समाज कधीही जातीयवादी नव्हता व त्यामुळे जातीयवादी कोण कोण आपल्यामध्ये फूट पाडून राज्य करण्याची नीती अवलंबत आहे हे सर्व भारतातील नागरिकांना माहित झालेले आहे त्यामुळे आपल्या मतदानाद्वारे भारताची लोकशाही अजून बळकट करून हिंदू मुस्लिम एकोपा अबाधित राहावा संविधान सुरक्षित रहावे देशाच्या उन्नती व प्रगतीसाठी शेतकरी कष्टकरी सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या संख्येने निवडून देण्याचे काम करणार आहेत व त्यामुळे सत्तेची मस्ती चढलेल्या महायुतीच्या नेत्यांना आपली जागा दाखवणार असल्याचे पत्रक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड शहर प्रमुख शेख निजाम यांनी आपल्या पत्रकात म्हटले आहे.

पान ६ वरून...

### मतदानाची टक्केवारी वाढवा

भ्रष्ट विचार आणि भ्रष्ट संस्कृती ही देशाला घातक आहे. पारदर्शकतेने कारभार करणारे लोक संसदेत गेले पाहिजेत. म्हणून प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावने आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी ८०% पर्यंत जाईल, याची काळजी मतदारांनी घ्यावी, असे आवाहनही ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

### शहीन बाग आंदोलनावेळी

महाविकास आघाडीला मुस्लिम समाजाची मत मागण्याचा अधिकार नाही असे मत अशोकराव हिंगे पाटील यांनी यांनी व्यक्त केले यावेळी जिल्हाभरातील प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती यामध्ये धम्मानंद साळवे, भारत तांगडे, अंकुश जाधव, अनिल डोंगरे, सचिन उजगरे, बालासाहेब जगतकर, बाबुराव मस्के, डॉ. संजय नाकलगावकर, राजरतन खळगे, रामभाऊ उदमले, संदीप फंदे, राम देशमाने, पाशाभाई शेख भारतीय बौद्ध महासभेचे श्रीराम मोरे, यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रत्येक वेळी मुस्लिमांना गृहीत धरणाऱ्या महाविकास आघाडीला धडा शिकवा - मुजमिल पटेल

प्रत्येक वेळी मुस्लिमांना गृहीत धरायचे भाजपाचे भीती दाखवायची आणि मुस्लिम मत पदरात पडून घ्यायची हे महाविकास आघाडीची खेळी यावेळी मुस्लिम समाजाने ओळखले आहे त्यामुळे मुस्लिम समाज कदापिही महाविकास आघाडीच्या भुलतापणा बळी पडणार नाही असे मत मुजमील पटेल यांनी व्यक्त करून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

### बीडची निवडणूक अहंकार

प्रतिसाद अभूतपूर्व आहे. माझी निवडणूक लोकांनी हातात घेतली आहे. यावेळी हजारो लोक उपस्थित होते.आ. संदीप क्षीरसागर म्हणाले की, बीड जिल्ह्यात इतिहास घडतो आहे स्वार्थासाठी एकत्र येणाऱ्यांना लोकांना घरी बसवायचं लोकांनी आता ठरवलं आहे. माजी आ. स. सलीम म्हणाले की, संविधान धोक्यात आलं आहे. भाजपाला मत म्हणजे संविधानाला धक्का आहे. दलित आणि मुस्लिम बांधव कमालीचा झालेला आहे. आमच्या पुढच्या पिढीच्या रक्षणासाठी शरद पवारांचे हात बळकट केल्याशिवाय पर्याय नाही.

### पंकजा मुंडे यांना मताधिक्य देण्याचा

देण्याचा निर्धार केला. प्रसंगी गेवराई येथील खरेदी विक्रीचे अध्यक्ष जनार्दन पांचाळ , सावंत , काळे , झेडेकर , अशोक गायकवाड , बबन सोनवणे , लक्ष्मण काशीद , वडवणी येथील गणेश डोरले , बाळासाहेब डोरले , गणेश पांचाळ , धारूर येथील संदिपान पांचाळ , रवि पांचाळ , महादेव पांचाळ व सुतार समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक भगवान चौधरी सर , कल्याण आबुज , डॉ. उद्धव नाईकनवरे यांच्या सह माजलगाव तालुक्यातील सुतार समाज बांधव व महिला भगिनींनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती नोंदवली होती.

### बारामतीचे मतदान ५ टक्क्यांनी

आहे. हे दोन्ही भाग मतदानाच्या दिवशी चांगलेच चर्चेत होते. मतदानाच्या आदल्या रात्री भोरच्या वेल्हे परिसरात अजितदादा गटाकडून पैसे वाटण्यात आल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला होता. तर इंदापूरमध्ये दत्तात्रय भरणे यांनी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्याला शिवीगाळ केली होती. त्यामुळे दिवसभर इंदापूर आणि भोर हे भाग चर्चेत होते. इंदापूरमध्ये अजितदादा गटाच्या दत्तात्रय भरणे यांनी संपूर्ण ताकद पणाला लावली होती. याशिवाय, त्यांना भाजपच्या हर्षवर्धन पाटील यांची साथ होती. त्यामुळे इंदापुरात मतदानाची टक्केवारी चांगली राहिली आहे. ही अजित पवारांच्यादृष्टीने सकारात्मक गोष्टी म्हणावी लागेल.

बारामतीमधील मतदानाची प्रमुख वैशिष्ट्यै

बारामती लोकसभा मतदारसंघात खडकवासला हा सर्वाधिक मोठा मतदारसंघ आहे. याठिकाणी मतदारांची संख्याही सर्वाधिक आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्याविरोधात उभ्या राहिलेल्या भाजपच्या कांचन कुल यांना खडकवासल्यातून ७० हजारांची आघाडी मिळाली होती. मात्र, यंदा खडकवासल्यात अवघे ५० टक्के मतदान झाले आहे. ही बाब अजित पवार आणि महायुतीचं टेन्शन वाढवणारी आहे. खडकवासल्यात भाजप आणि अजितदादांचा पाठिराखा वर्ग असल्याने या भागातून जास्तीत जास्त मतदान होणे आवश्यक होते.

भोर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे यांनी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. त्यामुळे या भागातून सुप्रिया सुळे यांना आघाडी मिळण्याची आशा आहे. २०१९ च्या तुलनेत भोरमध्ये मतदानाचा टक्का वाढला आहे. ही गोष्ट सुप्रिया सुळे यांच्या पथ्यावर पडणार का, हे आता पाहावे लागेल. तर भाजपचे राहुल कुल आमदार असलेल्या दौंडमध्ये मतदानाचा टक्का कमी झाला आहे. याचाही सुप्रिया सुळे यांना फायदा होऊ शकतो. तर पुरंदर मतदारसंघातही मतदानाची टक्केवारी कमी असली तरी ती २०१९ च्या तुलनेत फारशी बदललेली नाही. मात्र, पुरंदरमध्ये जितके मतदान झालेले आहे ते पूर्णपणे सुनेत्रा पवारांच्या बाजूने वळाले आहे का, ही गोष्ट आगामी काळात स्पष्ट होईल.

### धारूर तालुक्यातील

शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांचे लोकसभा निवडणुकीतील निवडणूक चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस पोहोचवण्यात आले आहे.

धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यात राष्ट्रवादीची युवक टीम सक्रिय.

शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी( शरद पवार) गटाचे युवक तालुका अध्यक्ष गणेश बापू थोरात निलेश ढगे, विशाल वैरागे, दीपक ढगे, बाबूराव साखरे, अनिल साखरे ,तिडके सह असंख्य कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष मतदारांपर्यंत बजरंग सोनवणे यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस पोहोचवले आहे.

धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील वाडी वस्ती व तांड्यावरील मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना मताधिक्य देण्याचे आव्हान केले आहे तसेच तालुक्यातील घराघरात निवडणूक चिन्ह तुतारी वाजविणारा माणूस पोहचवले आहे.

### पाटोदा शहरात शिवसेना

शिवसेना तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे , युवासेना प्रमुख अजिंक्य डोरले , राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव , शेतकरी नेते गणेश कवडे , काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव , शेतकरी कामगार पक्षाचे तालुकाध्यक्ष विष्णुपंत घोलप , अल्पसंख्यांक तालुका फारुख खाजा , किसान सेल तालुका प्रमुख रामेश्वर नागरगोजे , पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष अनंत जावळे , सोमनाथ लवूळ , शेतकरी सेनेचे तालुका उपाध्यक्ष अशोक बापू घोशीर यांच्यासह पाटोदा तालुक्यातील सर्व महाविकास आघाडी घटक पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते .

# कांदा निर्यातबंदी हटवली तरीही दरात वाढ नाहीच

देशात महागाई वाढू नये म्हणून सरकार सातत्यानं शेतमालाच्या संदर्भात विविध धोरणं आखत आहे. कांद्याचे दर नियंत्रणात राहावे म्हणून सरकारनं डिसेंबर २०२३ मध्ये कांद्याच्या निर्यातीवर बंदी ( ) घातली होती. यानंतर आता ३ मे रोजी सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी हटवली आहे. निर्यातबंदी हटवून ४ दिवस झाले तरीदेखील अद्याप कांद्याच्या दरात वाढ झालेली नाही. याचा शेतकऱ्यांना फटका बसतोय. जाणून घेऊयात कोणत्या बाजारपेठेत कांद्याला किती दर मिळतोय.

अनेक ठिकाणी एक किलो कांद्याला मिळतोय २ ते ३ रुपयांचा दर

कांदा निर्यातबंदी हटवून चार दिवस झाले आहेत. अद्यापही कांद्याच्या दरात वाढ झालेली दिसत नाही. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या कांद्याला २ रुपाचा देखील दर मिळत आहे. अनेक शेतकऱ्यांना २ रुपये ते १० रुपये प्रति किलोच्या दरम्यानचा दर मिळत आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार संगमनेरमध्ये एक किलो कांद्याला २ ते ३ रुपयांचा दर मिळाला. तर येवल्यात प्रतिकिलो कांद्याला ३ रुपये तर मनमाडमध्ये प्रतिकिलो कांद्याला ४



रुपयांचा दर मिळाला आहे. दरम्यान, कांद्याची निर्यात खुली होऊन देखील शेतकऱ्यांच्या कांद्याला दर मिळत नसल्यानं शेतकरी चिंतेत आहेत.

कांद्यावरील निर्यातबंदी उठवून देखील दर का वाढत नाही?

दरम्यान, कांद्यावरील निर्यातबंदी उठवून देखील दर का वाढत नाही? असा प्रश्न सर्वांनाच पडला असेल. तर याच उत्तर आहे सरकारचं धोरण. कारण, सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली खरी पण निर्यातीसाठी प्रति टन ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य आकारले आहे. तर ४० टक्के निर्यात शुल्क आहे. त्यामुळं निर्यातबंदी उठवून देखील कांदा निर्यात होण्याची शक्यता कमीच आहे. कारण किमान निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्क लागू केल्याचा फटका बसत आहे. दरम्यान, या अटी शर्ती लागू न करता कांद्याच्या निर्यात केली जावी अशी मागणी विविध शेतकरी संघटनांनी केली आहे.

## कोणत्या बाजारात कांद्याला किती दर?

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार नागपूरच्या बाजारात प्रति क्विंटल कांद्याला किमान भाव फक्त १००० रुपये, तर कमाल १५०० रुपये आहे. तर सरासरी १३२५ रुपये प्रतिक्विंटलला दर मिळत आहे. तर अकोला बाजारात कांद्याला किमान ८०० रुपये तर कमाल १५०० रुपयांचा दर मिळत आहे. तर सरासरी दर हा १२०० रुपये मिळत आहे. चंद्रपूरच्या बाजारात किमान भाव १३०० रुपये, कमाल २००० रुपये आणि सरासरी १६०० रुपये प्रतिक्विंटल मिळत आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : साली मेवाड शासक महाराणा प्रताप आणि मुघल शासक बादशाहा अकबर यांच्यात हल्दीघटीचे युद्ध झाले.
१६५३ : साली विश्वविख्यात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नोंदल्या गेलेली ऐतिहासिक वास्तू ताजमहल ची निर्मिती जवळपास २२ वर्षांनंतर पूर्ण झाली
१८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरु झाली.
१८७७ : पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.
१९०४ : वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी / ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले.
१९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो मधे प्रवेश.
१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
१९९९ : अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.
१९९९ : ग्वाटेमालाच्या ज्युलिओ मार्टिनेझ याने ग्रॅन्ड प्रिक्स स्पर्धेतील वीस किलोमीटर चालण्याची शर्यत १ तास १७ मिनिटे व ४६ सेकंदात पूर्ण करुन नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी गुगलने इंटरनेट प्रोग्राम एड्सेंस सादर केला.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यासाठी आपला टोही नावाचा उपग्रह प्रक्षेपित केला.
२०१२ : अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी समलैंगिक विवाह करण्यास आपली अनुमती दिली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष महाराणा प्रताप.
१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर, इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार
१८३६ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचा जन्मदिन.
१८६६ : गोपाळ कृष्ण गोखले, भारतीय स्वातंत्र्यसेनानी, मराठी समाजसुधारक.
१८८६ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९ पुणे)
१८९६ : थोर स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेता व शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्मदिन.
१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते, मराठी कामगार चळवळ कार्यकर्ते, लेखक.
१९३५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी कवयित्री स्नेहमयी चौधरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : भगवद्भक्त चोखा मेळा हा मंगळवेढे येथील गावकुस बांधत असताना कोसळणार्या कुसबाखाली सापडला.
१९१७ : डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ कान्होबा रणझोडदास यांचे निधन.
१९१९ : रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १८६१)
१९३१ : वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक अल्बर्ट मायकेलसन यांचे निधन. (जन्म: १९ डिसेंबर १८५२)
१९५९ : थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)
१९५९ : साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी विषयाचे प्राध्यापक व महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय तसचं, राष्ट्रवादी, हिंदी आणि आर्य सामाजीक भारतीय स्वामी भवानी द्याल संन्यासी यांचे निधन.
१९८६ : एवरेस्ट शिखर सर करणारा शेरपा तेलसिंग नोर्गे यांचे निधन. (जन्म: २९ मे १९१४)
१९९५ : दिग्दर्शक अनंत माने यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)
१९९८ : पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा तलत महमूद यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९२४ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९९ : उद्योगपती करमसीभाई जेठाभाई सोमय्या यांचे निधन.
२००४ : चेचेन्या येथे झालेल्या विस्फोटात तेथील राष्ट्रपती अखमद कादरोव यांचे निधन.
२००८ : किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक पं. फिरोझ दस्तूर यांचे निधन.
२०१४ : भारतीय राजकारणी नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

# फळे आणि भाजीपाला पिकांच्या लागवडीतून मिळवतेय लाखो रुपये



अलीकडच्या काळात शेती क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत आहेत. तरुण शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भरघोस उत्पादन घेत आहेत. शेती क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीनं महिला देखील यश मिळवताना दिसतायेत. आज आपण अशाच एका महिलेची यशोगाथा पाहणार आहोत. या महिलेनं फळे आणि भाजीपाला पिकातून स्वत:ची आर्थिक प्रगती साधलीय. निलीमा असं या महिलेचं नाव आहे. या महिलेनं नर्सरीमध्ये फळे आणि भाजीपाला पिकांची लागवड केलीय. या माध्यमातून ही महिला मोठा नफा मिळत आहे.

फळे आणि भाजीपाल्याासह रोपवाटीकाही तयार

निलीमा देवी या बिहारमधील बांका जिल्ह्यातील पोखरिया गावातील रहिवासी आहेत. त्यांनी नर्सरीमध्ये फळे आणि भाजीपाला लागवड केली आहे. यातून त्या चांगला नफा मिळवत आहेत. याचबरोबर निलीमा या नर्सरीमध्ये रोपवाटीका देखील तयार करत आहेत. यातून चांगले पैसे त्यांना मिळत आहेत.

सुरुवातीला फळे आणि भाजीपाला पिकाच्या लागवडीचे प्रशिक्षण

निलीमा यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१९ पासून त्यांनी शेती करायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात अनेकांनी मार्गदर्शन केले. सुरुवातीपासूनच त्यांचा कल हा भाजीपाला लागवडीकडे होता. कृषी विज्ञान केंद्राच्या अधिकाऱ्यांनी त्यांना भाजीपाला लागवडीच्या तंत्रज्ञानाबरोबच त्याच फायदेही सांगितले. त्यानंतर निलीमा यांनी फळे आणि भाजीपाला पिकाच्या लागवडीचे प्रशिक्षण देखील घेतलो.

मिरची, कोबी, कोबी, भेंडी, कारले यांची रोपे तयार केली जातात : दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, फळ आणि भाजीपाला पिकांच्या लागवडीतून निलीमा देवी या वर्षाला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवतात. फळ आणि भाजीपाल्यासह रोपवाटीकेच्या माध्यमातून निलीमा वर्षाला चार लाख रुपये मिळवतात. निलीमा या विविध प्रकारती रोपे देखील तयार करतात. यामध्ये मिरची, कोबी, कोबी, भेंडी, कारले यांचा समावेश आहे.

# मुरघास निर्मिती तंत्र

मुरघास खरे तर हि एक आंबवण्याची प्रक्रीया आहे . मुरघास म्हणजे हवा विरहीत जागेत किंनविकरण करून साठवलेला हिरवा चारा किंवा अगदी सोप्या भाषेत सांगावयाचे झाले तर हिरव्या चाऱ्याचा फारसा कस कमी न होऊ देता हवाबंद स्थितीत साठऊन ठेवण्याच्या पद्धतीस मुरघास असे म्हटले जाते.

मुरघास पद्धतीनेच चारा का साठवावा ? चारा साठवण्याच्या इतर काही पद्धतीमध्ये मुरघास हि एक महत्वाची पद्धत आहे , त्याच कारण अस कि पारंपारिक पद्धतीमध्ये चारा वाळऊन साठवला जातो. परंतु याद्वारे साठवलेल्या चाऱ्यातील पोषक द्रव्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. मात्र मुरघास पद्धतीने साठवलेल्या चाऱ्यातील ऱ्हास अगदी कमी प्रमाणात होतो तसेच हा चारा जनावरे अगदी चवीने खातात.

मुरघास पासूनचे फायदे : आपली बरीचशी चारा पिके पावसावर येणारी असतात आणि आपल्याकडे बाराही महिने हिरवा चारा मिळण्यासाठी बागायतीची कमतरता आहे. त्यामुळे हिरव्या चाऱ्याचा तुटवडा उन्हाळ्यात भासतो. म्हनून हिरव्या चाऱ्यासारखा गुणवत्ता असणारा चारा म्हणजे मुरघास असल्याने दुभत्या जनावराना उत्पादन सातत्य राखण्यासाठी तो उपयोगी ठरतो. याचे फायदे सांगायचे झाले तर याद्वारे हिरवा चारा चांगल्या अवस्थेत दीर्घकाळ टिकून ठेवता येतो. गवतासारख्यानिकृष्ठ वनस्पतीपासुनही चांगल्या प्रकारे मुरघास करता येतो. जास्त प्रक्षेत्रावरील पिक कमी जागेत साठून ठेवता येते, चारा पिक लवकर कापणी होत असल्यामुळे शेत दुसऱ्या पिकाकरीता मोकळे होते.

मुरघास करण्यासाठी साधारणपणे पिके निवड: चांगल्या प्रकारचा मुरघास तयार करण्यासाठी एकदल चारा पिके द्विदल चारा पिकापेक्षा अतिशय योग्य आहेत. कारण ज्या पिकांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते त्या पिकांपासून अतिशय उत्कृष्ट मुरघास तयार होतो. यामुळे तृणधान्य पिके योग्य समजली जातात. त्यामध्ये मका आणि ज्वारी या पिकापासून उत्कृष्टमुरघास तयार होतो. याशिवाय बाजरी, संकरीत नेपियर,ओट याएकदलवर्गीय पिकापासून चांगला मुरघास तयार करता येतो. द्विदल चारा पिकापासुनही मुरघास तयार करता येतो पण त्यासाठी या पिकासोबत ५० टक्के एकदलवर्गीय पिक साठवावे लागते तसेच गुळाचा योग्य वापर



आवश्यक असतो. योग्य मुरघास तयार करण्यासाठी चारा पिके ५० टक्के फुलोरा अवस्थेत असताना कापणी करावी लागते.

पिक निवडल्यावर मुरघास तयार करण्याची पद्धती

मुरघास तयार करताना जमिनीत खड्डा करून किंवा जमिनीवर सायलो बंकरचे बांधकाम करून घ्यावे लागते. सध्या प्लास्टिक बॅगचा वापर करून सुद्धा मुरघास तयार करता येतो. जमिनीमध्ये खड्डा करावयाचा असल्यास त्याचा आकार हा त्या ठिकाणची स्थानिक परिस्थिती, जमिनीतील पाण्याची पातळी आणि जनावरांची संख्या यावर अवलंबून असतो. खड्डा शक्यतो उंच जागेवर असला पाहिजे, म्हणजे पावसाचे पाणी त्यात झिरपणार नाही . खड्ड्याच्या भिंती सिमेंटने प्लास्टर करून हवाबंद कराव्यात किवा हे शक्य नसल्यास २०० मायक्रोन प्लास्टिक पेपर खड्ड्यात अंथरावा.त्यानंतर चार्याचे पिक फुलोऱ्यात आल्यावर कापणी करावी आणि चार ५ ते ६ तास सुकू द्यावा, म्हणजे त्यातील ओलाव्याचे प्रमाण ८० टक्के वरून ६० ते ६५ टक्के पर्यंत कमी होईल. त्यानंतर कुट्टी मशिनच्या सहायाने सुकवलेल्या चार्याची, एक इंच आकाराचे तुकडे होतील अश्या पद्धतीने कुट्टी क्तारून घ्यावी. त्यानंतर प्रती टन चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी १ किलो युरिया ,२ किलो गुळ, १ किलो मिनरल मिक्चर , १ किलो मीठ आणि १ लिटर ताक यांचे वेगवेगळे मिश्रण तयार करून त्याचे एकत्रित १० ते १५ लिटरचे द्रावण तयार करावे . त्यानंतर खड्यात कुट्टी भरण्यास सुरुवात करावी . चार ते सहा इंचाचा थर देऊन झाल्यावर त्यावर तयार केलेले मिश्रण शिपडावे. त्यानंतर थर चोपनीने किंवा धुमसणे चोपून चांगला दाबून घ्यावा , अश्या पद्धतीने थरावरथर देऊन खड्डा भरून घ्यावा म्हणजे त्यात हवा राहणार नाही. खड्डा जमिनीच्या वर १ ते १.५ फुट भरून प्लास्टिक कागदाने काळजीपूर्वक झाकून घ्यावा . त्यावर वाळलेले गवत, उसाचे पाचट, गव्हाचे काड टाकून त्यावर मातीचा थर देऊन खड्डा हवाबंद करावा. मुरघास तयार होण्यास ४५ ते ६० दिवस लागतात .

मुरघास चांगला तयार झाल्याचे गुणधर्म:

मुरघासाची प्रत कशी आहे हे आपण त्याचा वास, रंग आणि सामू यावरून ठवता येते. जर मुरघासास आंबट गोड दह्यासारखा वास येत असेल आणि रंग पिवळसर , फिक्कट हिरवा असल्यास उत्तम प्रकारचा मुरघास तयार झाला आहे असे समजावे. याशिवाय जर मुरघासाचा सामू ३.८ ते ४.२ दरम्यान असेल तर उत्तम प्रकारचा मुरघास तयार झाला आहे असे समजावे. पण मुरघासाचा वास कुजल्यासारखा आणि रंग काळसर झाला असेल तर मुरघास खराब झाला आहे असे समजून तो जनावरांना खाऊ घालू नये. उत्तम मुरघास तयार झाल्यानंतर ६ महिने ते एक वर्ष्यापर्यंत जनावरांना खाऊ घालता येतो.

जनावरांना मुरघास देण्याचे प्रमाण : पूर्ण वाढ झालेल्या दुभत्या जनावरास रोज १५ किलोपर्यंत मुरघास खाऊ घालावा. बैलांना ७ ते ८ किलो प्रती दिन, तसेच एक वर्षापेक्षा कमी वयाच्या वासरांना अर्धा किलो , शेळ्या मेंढ्यांना दर रोज एक किलो मुरघास खाऊ घालावा.

# प्रक्रिया उद्योगासाठी आंबा अप्रतिम फळ; आंब्यापासून बनवा हे विविध पदार्थ

आंबा हे फळ आपल्याला सगळ्यांना त्याच्या सुमधूर चव आणि सुगंध यासाठी परिचित आहे, तसेच त्यामध्ये असलेल्या अति गर मुळे आंब्याला फळांचा राजा असे संबोधले जाते. जर आंबा व त्यावरील प्रक्रिया उद्योगांचा विचार केला तर आंब्यापासून बनलेल्या प्रक्रियायुक्त पदार्थांना वर्षभर आपल्या देशात व अन्य देशात बाहेरील भरपूर मागणी असते. त्यामुळे आंबा फळ प्रक्रिया उद्योग हा एक निश्चितपणे यशस्वी होण्याचा एक खात्रीलायक मार्ग आहे. या लेखामध्ये आपण आंब्यापासून तयार होणाऱ्या विविध प्रक्रियायुक्त पदार्थांना विषयी माहिती घेणार आहोत.

आंब्यापासून स्क्वॅश बनवणे : जर आंब्यापासून स्पेशल बनवायचे असेल तर आंबे हे टणक आणि आंबट पण असलेल्या हवे. अगोदर कच्च्या आंब्याचा वापर करताना फळे शिजवून त्यामधील गर काढावा लागतो. यामध्ये एक किलो गरात एक किलोग्राम साखर, एक लिटर पाणी, २० ते ३० ग्रॅम सायट्रिक आम्ल आणि गरजेप्रमाणे नारंगी, पिवळा खाण्याचा रंग या घटकांचा वापर करतात. तयार झालेल्या स्क्वॅश चा ब्रिक्स ४५ अंश तर आम्लता १.५ टक्के असावी. स्क्वॅश तयार झाल्यानंतर एक मिली च्या चाळणीतून गाळून काढावा तसंच यामध्ये ६१० मिलिग्रॅम प्रतिलिटर सोडिअम बेन्झोएट मिसळावेहनी स्क्वॅश निर्जंतुक केलेल्या बाटल्यांत भरून थंड ठिकाणी साठवावा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जंतुविरोधी परिरक्षक वापरले नसल्यास स्क्वॅश भरलेल्या बाटल्यांचे गरम पाण्यात तीस मिनिटे पाश्चरीकरण करावे.

आंब्याचे काप : आंब्याचे काप तयार करण्यासाठी टणक आणि काहीशी कमी पिकलेली फळे निवडून त्या फळांवरील साल काढून त्या गराचे काप काढावेत. कापलेले काप काळे पडू नयेत म्हणून ते दोन टक्के मिठाच्या द्रावणात किंवा साध्या पाण्यात बुडवून ठेवावेत. हे काप मलमल कापडात गुंडाळून उकळत्या पाण्यात पाच ते दहा मिनिटे शिजवावे. नंतर हे शिजवलेले काप कापडावर पसरून त्यास स्टीलच्या फोर्कने भोक पाडावीत. कपाच्या वजनाएवढे त्यामध्ये साखर घेऊन त्याचा १:३ पाणी घालून पाक करावाआणि त्यात नंतर १.५ ग्रॅम प्रति किलो सायट्रिक अम्ल घालून काप मिसळावेत. या मिश्रणाला चाकून ३ते चार मिनिटे १०६ अंश सेंटिग्रेड तापमानाला तीन-चार तारी पाक होईपर्यंत गरम करावे. नंतर हे काप पाका सहित बरणीत भरून साठवाव्यात जर या कापांची दीर्घकाळ साठवून करायचे असेल तर प्रति किलो



६०० मिलिग्रॅम सोडिअम बेन्झोएट मिसळावे.

आंब्याच्या फोडी पाकात टिकवणे : यासाठी पूर्ण पिकलेली, टणक फळे निवडावीत. फळे स्वच्छ करून त्यावरील साल वेगळी करून घ्यावी आणि चाकू च्या मदतीने घराचे सहा ते आठ तुकडे आंब्याच्या कोई पासून वेगळे करावेत. साधारणपणे ५०० ग्रॅम गराचे तुकडे एखाद्या कॅनमध्ये भरून त्यावर ४० अंश ब्रिक्स असलेला साखरेचा गरम पाक तुकडे बुडेपर्यंत ओता व. या पाकामध्ये दोन टक्के सायट्रिक आम्ल मिसळावे. भरलेल्या केन ८० अंश सेंटिग्रेड तापमानास सात मिनिटे गरम करून सील करावे. नंतर या सील केलेल्या कॅन उकळत्या पाण्यात वीस मिनिटे ठेवून थंड कराव्यात.

आंब्याच्या गरापासून सरबत

हंगामातील ताज्या आंब्याचा गर काढून किंवा साठवणूक केलेल्या हवाबंद कॅन किंवा बाटल्या मधील गरापासून गरजेप्रमाणे आंब्याचे मधुर चव युक्त सरबत तयार करता येते. हापुस, केसरइत्यादी आंब्यांच्या जाती पासून उत्तम प्रकारचे सरबत तयार करता येते. साधारणपणे आंब्याच्या घराचा ब्रिक्स १५ ते १८ तर आम्लता ०.५ टक्के असते. यावरून सरबताचे सूत्र प्रमाणे करण्यात आले आहे. जेव्हा सरबत तयार करायचे असते तेव्हा आंब्याच्या जातीनुसार १५ ते २० टक्के गर वापरावा आणि साखर घालून त्याचा ब्रिक्स १५% करावा. तसेच त्यामध्ये ०.२६ टक्के सायट्रिक आम्ल मिसळल्यास सरबत स मधुर अशी आंबट गोड चव प्राप्त होते. साधारणपणे एक किलो केसर किंवा हापूसच्या गरात आठशे ग्रॅम साखर, दहा ग्रॅम सायट्रिक आम्ल आणि ५.५ लिटर पाणी मिसळावे. तसेच आवश्यकतेनुसार त्यामध्ये खाण्याचे नारंगी किंवा पिवळा रंग प्रत्येकी २०० मिलीग्राम मिसळावेत. आंब्याच्या ताज्या घरापासून सरबत करून लगेच वापरता त्यांमध्ये जंतुविरोधी रसायने मिसळण्याची गरज नाही.परंतु जर सरबत साठवायचे असल्यास किंवा विक्रीसाठी बाजारात पाठवायचे असल्यास त्यामध्ये प्रतिलिटर तीन ची मिलीग्राम सोडियम बेंजोएट प्रति लिटर ३०० मिलिग्रॅम सोडिअम बेन्झोएट मिसळून निर्जंतुक केलेल्या कॅनमध्ये साठवणूक करावी.

आंब्याचा गर: पूर्ण पिकलेले फळापासून गर काढून तो हवाबंद कॅनमध्ये किंवा बाटल्यात दीर्घकाळ साठवून ठेवता येतो.आंब्याचा पल्प साठी पिकलेली परंतु टणक असलेली फळे निवडावीत. फळावरील साल हाताने अलगद वेगळी करून इस साल काढलेली फळे पल्पर मध्ये काढून गर आणि को या वेगळ्या कराव्यात. हा वेगळा झालेला गर मिक्सरमध्ये घालून एकजीव करून घ्यावा. हा गर गरजेप्रमाणे मलमलच्या कापडातून गाळून घेतल्यास त्यामधील तंतुमय घटक वेगळे करता येतात. नंतर या गरामध्ये आवश्यक ती गोडी आणण्यासाठी त्यामध्ये गरजेनुसार साखर घालावी आणि मिश्रण एकजीव करून वाफेच्या कॅटल मध्ये किंवा पातेल्यात ८०पाऊस सेंटिग्रेड तापमानास २० मिनिटे गरम करावे तो लगेच कॅनमध्ये भरून कॅन यंत्राच्या साह्याने हवाबंद कराव्यात नंतर या हवा बंद केलेल्या कॅन उकळत्या पाण्यात वीस मिनिटे ठेवून थंड कराव्यात.

# परळी येथील ईव्हीएम कार्यान्वित प्रक्रियेची जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात मतदान सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून यासाठीची जय्यत तयारी सुरू आहे.सहा विधानसभांमधील मतदान केंद्रानुसार सरमिसळ झालेली असून आता या मशीनचे कमिशनिंग म्हणजेच बॅलेट युनिटमध्ये बॅलेट पेपर लावणे, कंट्रोल युनिट तपासणे आणि व्हीव्हीपॅट कागदाचे रोल तसेच त्याची तपासणी करून सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परळी येथील होत असलेल्या कमिशनिंगच्या ठिकाणी मंगळवारी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परळी विधानसभेचे सहायक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर व परळीचे तहसिलदार व्यंकटेश मुंडे , नायब तहसिलदार मिलींद गायकवाड, बाबुराव रुपनर, अन्ना वंजारे हे ईव्हीम प्रक्रिया पाहणी करते वेळी सोबत उपस्थित होते.परळी येथे एकुण ३४२ मतदान केंद्राकरिता ३५ टेबलावर सिलींग प्रक्रिया करण्यात आली .

या प्रसंगी बीड जिल्हाधिकारी तथा



निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काही ईव्हीम सिलींगबाबत महत्त्वाच्या सूचना करताना सुरक्षात्मक उपायांबद्दल माहिती दिली. तसेच यावेळी १००० मॉक पोल करिता ५ टक्के या नुसार १८ मतदान केंद्र चिट्ठया राजकीय पक्ष प्रतिनीधीचे उपस्थितीत काढण्यात आल्या. कमिशनिंग नंतर स्ट्राँग रुम मध्ये मशीन सील करून ठेवण्यात येणार आहेत . सिलींग केलेल्या मशीन्स दिनांक १२ मे २०२४ रोजी मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षासह पाठवण्यात येतील. दिनांक १३ मे रोजी मतदान सुरू होण्याच्या दीड तासापूर्वी उमेदवार यांचे मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष अभिरुप मतदान घेऊन निवडणूक आयोगाने सांगितलेल्या प्रक्रियेनुसार ईव्हीम मशीनद्वारे प्रत्यक्ष मतदानाला सकाळी ०७ .०० वाजता सुरुवात होईल. ईव्हीएम मशीन्सला हाताळण्याचे तांत्रिक प्रशिक्षण सर्व पथकांना व मतदान अधिकारी यांना दिलेले असून त्याप्रमाणे मतदान सुरळीत पार पडण्यासाठी सर्व आवश्यक व योग्य ती कार्यवाही मतदान दिनांक १३ मे २०२४ रोजी करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना केल्या.

# कर्तव्यार्थ अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ९ ते ११ मे पर्यंत मतदान सुविधा

बीड । प्रतिनिधी

मतदानापासून कोणतेही अधिकारी, कर्मचारी वंचित राहू नये यासाठी, बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे २३०-बीड विधानसभा मतदारसंघात दि.९, ते दि.११ आणि दि.१२ मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार, असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी कळविले आहे.

बीड विधानसभा मतदारसंघा अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी बीड तहसील कार्यालयात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच दिनांक १२ मे २०२४ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, कुर्ला रोड, बीड या ठिकाणी सुविधा केंद्र उभारून मतदान घेण्याची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदान होणाऱ्या इतर जिल्ह्यातील जे अधिकारी, कर्मचारी यांची पोलिंग स्टाफ म्हणून ३९-बीड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत मतदानाच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे व ज्यांनी पोस्टल




मतदानाचा नमुना क्रमांक १२ अर्ज भरलेला आहे अशा अधिकारी कर्मचारी यांची व पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी तहसील कार्यालय बीड येथे तहसीलदार यांच्या दालनात दिनांक ९ ते ११ मे रोजी पर्यंत सुविधा केंद्र उभारून मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अशा मतदारांचे पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी निश्चित ठिकाणी हजर राहून आपले मतदान करून घ्यावे व कोणीही अधिकारी, कर्मचारी मतदानापासून वंचित राहू नये. असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी केले आहे.

## थोडक्यात

### बीड टॅलेन्ट सर्च परिक्षा प्रथम फेजसाठी उस्फुर्त प्रतिसाद

बीड : समता सेवाभावी संस्था, धानोरा रोड, बीड येथील आयोजित केलेल्या बीड टॅलेन्ट सर्च स्कॅलरशीप परिक्षेस विद्यार्थी व पालकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. हि परिक्षा १ली ते ८वी च्या विद्यार्थ्यांची जिनिअस इंग्लिश स्कुल, बापुजी नगर, धानोरा रोड, बीड या ठिकाणी सुरळीतपणे संपन्न झाली. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या व विशेष गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, विविध प्रकारचे बक्षिसे संस्थे मार्फत जाहीर करण्यात येणार आहेत. या परिक्षेचा गणित, विज्ञान, बुद्धीमत्ता, जनरल नॉलेज, इंग्लिश ग्रामर आधारीत अभ्यासक्रम होता. विद्यार्थ्यांची अभ्यासाची इच्छा व क्षमता वाढावी हा या परीक्षेचा मुख्य उद्देश आहे. बीड शहर व परिसरातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या बीड टॅलेन्ट सर्च स्कॉलरशीप परिक्षा चा लाभ मिळावा याकरिता पालकांचे आग्रहास्तव परिक्षेचा दुसरा टप्पा २ जुन २०२४ रोजी आहे. परिक्षेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले नसून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### माजलगाव तालुक्यातील कर्मचाऱ्यांनी ईडीसी कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करावे

बीड : माजलगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यरत माजलगाव तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचे निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, गौरव इंगोले यांनी कळविले आहे. माजलगाव विधानसभा मतदार संघातील धारूर, वडवणी या तालुक्यातील ज्यांचे प्रथम प्रशिक्षण झालेले आहे त्यांनी निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. याप्रमाणे उद्या बुधवार दिनांक ८ मे २०२४ रोजी समाज कल्याण मुलींचे वस्तीगृह, केसापूर वसाहत, माजलगाव या ठिकाणाहून सर्व माजलगाव तालुक्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचे ईडीसी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी कळविले आहे.

### दत्ता गायकवाड यांची शिवसंग्राम मधून हाकलपट्टी -नारायण काशीद

बीड : शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे या लोकसभा निवडणूक लढवणार होत्या मात्र त्यांनी समज हितासाठी माघार घेत शिवसंग्रम निवडणूक रिंगणात उतरणार नाही आणि तटस्थ भूमिकेत राहील हे स्पष्ट केले नंतर शिवसंग्रामचे दत्ता गायकवाड यांनी शिवसंग्रामच्या धेय्य धोरण विरोधात जात अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांचे शिवसंग्राम मधून निलंबन करण्यात येत आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद यांनी दिली आहे.बीड लोकसभा निवडणूक आता जोर धरू लागली आहे. यात शिवसांग्रम तटस्थ भूमिकेत असून शिवसंग्रमचा कोणताही उमेदवार निवडणूक रिंगणात नाही. यात शिवसांग्रमचा कसलाही संबंध नाही. शिवसंग्रामच्या धेय्य धोरण विरोधात भूमिका घेतल्या कारणाने त्यांची शिवसंग्राम मधून हकाल पट्टी करत त्यांना निलंबित करण्यात येत आहे. यापुढे दत्ता गायकवाड यांचा शिवसंग्रामशी कसलाही संबंध नसणार आहे.असे पत्रकात शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद यांनी म्हंटले आहे.

# श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थान येथे, निळकंठेश्वर शिवलिंगाची भव्य प्राणप्रतिष्ठा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बालघाट डोंगररांगेच्या कुशीत उध्व कुंडलीका मध्यम प्रकल्पाच्या काठावर आणि ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वेदांतनगर या ठिकाणी सन-२०१८ मध्ये आचार्य श्री.विठ्ठल महाराज शास्त्रींनी श्रीक्षेत्र निळकंठेश्वर संस्थानची स्थापना केली.

अत्यंत दुर्लक्षित असलेल्या डोंगराळ,दुर्गम आणि खडतर परिसरामध्ये त्यांचा हा विश्व मांगल्याचा प्रवास सोपा नसताना अनेक संकटावर मात करून तो व्यवस्थित पुढे चालू ठेवला आहे त्याचाच एक प्रत्यय म्हणून या वर्षी संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर संस्थान येथे,संकल्पकपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर शिवलिंगाचे भव्य प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्ताने त्रिदिनी कीर्तन महोत्सव संपन्न झाले. आचार्य श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून श्री क्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांत नगर येथे,मागील पाच वर्षापासून लोक उपयोगी अनेक दिव्य सामाजिक आणि धार्मिक उपक्रमाच्या आयोजन करण्यात आलेले आहे त्यामध्ये बाल सुसंस्कार शिबीर, आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर वृक्षरोपण,अन्नदान,वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून



विविध व्याख्याने आणि कीर्तन महोत्सव यशस्वीपणे त्यांनी पारपाडलेले आहेत. संकल्पपुर्ती भगवान श्री निळकंठेश्वर प्राणप्रतिष्ठा व त्यानिमित्ताने आयोजित केलेले दिव्य शिवलिलामृत पारायण सोहळा आणि त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचा चैत्र वद्य एकादशीस शनिवार दि.०४ मे २०२४ रोजी शुभ मुहूर्तावर प्रारंभ झाला पहिल्याच दिवशी महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार असणाऱ्या तपश्विनी महंत राधाताई महाराज सानप यांचे सुश्राव्य कीर्तन झाले व त्यांनी आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री यांना अल्पवयात,अल्प वेळेत निळकंठेश्वर संस्थानाची फार मोठी प्रगती केली आहे उत्तर उत्तर प्रगती घडत राहो ऐश्वर्या संपन्न भगवान बाबांचा आपल्याला आशीर्वाद आहे असा आशीर्वाद त्यांनी दिला रविवार दि.०५ एप्रिल २०२४ रोजी भगवान श्री निळकंठेश्वराचे हे शिवलिंग आणि नंदी ४०० किलो वजनाचे असून ते मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथील नर्मदा नदी पात्रातील आहे हे शिवलिंग नर्मदा मैय्यातील असून अल्प भक्तीने संतोषीत होऊन भक्तांच्या मनोकामना व संकल्पपुर्ती पूर्ण होते अशी शिवभक्तांची श्रद्धा आहे मराठवाड्यातील ओजस्वी आणि तेजस्वी महानतांच्या शुभ हस्ते ही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली त्यामध्ये स्वामी श्री.भारतानंदजी गिरी,डॉ. नामदेव शास्त्री भगवानगड, प्रेममुर्ती आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, शांती ब्रह्मचारी महंत नवनाथ महाराज गोरक्षनाथ टेकडी, गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंनडे बंकट स्वामी,गुरुवर्य एकनाथ महाराज स्वामीजी, तपोनिधी महादेव महाराज चाकरवाडीकर, लक्ष्मीताई वडवणी आदींच्या शुभ हस्ते शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा झाली तर पुरोहित यज्ञाचार्य वे.मू.अक्षयशास्त्री रत्नपारखी श्रीराम मंदिर अयोध्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे विशेष मानकरी असणारे यांच्या मंत्र उच्चारणे श्री निळकंठेश्वराची शिवलिंगाचे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली या यज्ञच्या पूजेसाठी शेकडो स्त्री पुरुषाच्या जोड्या बसल्या होत्या तर सायंकाळी वेदांताचार्य महंत श्री. विवेकानंद महाराज शास्त्री सिद्धेश्वर संस्थान श्रीक्षेत्र शिरूर का. यांचे सुश्राव्य कीर्तन रुपी सेवा पारपडली तसेच विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या वाढदिवसाच्या दिवशी अर्थात चैत्र वद्य त्रयोदशी सोमवार दि.६ एप्रिल २०२४ रोजी भागवताचार्य केशव महाराज उखळीकर यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तनाने या महोत्सवाची सांगता झाली.

संकल्प पूर्ती भगवान श्री निळकंठेश्वर प्राणप्रतिष्ठा व भव्य त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला तसेच या संपूर्ण महोत्सवाचे महिमा कीर्तनाचा या यूट्यूब चॅनल वर लाईव्ह प्रक्षेपण केल्यामुळे लाखो भाविक भक्तांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचवला. अत्यंत दुर्लक्षित असलेल्या भागाचे आज निसर्गाच्या सानिध्यात नंदनवन केले आहे प्राचीन काळाची गुरुकुल व्यवस्थेची आठवण या ठिकाणी आल्यावर आल्याशिवाय राहत नाही पश्चिम महाराष्ट्राची अनुभूती या ठिकाणी येते कोणत्याही प्रकारचा शासनाची अनुदान नसताना हे संस्थान महाराजांनी उभे केले आहे या ठिकाणी झालेल्या महोत्सवाची संपूर्ण वडवणी तालुक्यामध्ये चर्चा होत आहे.

## वाघळुज येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत संवाद बैठक

आष्टी । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून संपूर्ण राज्यामध्ये लढा लढविणारे संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आष्टी तालुक्यातील वाघळूज येथे मराठा समाजाची संवाद बैठक आज दि.९रोजी गुरुवारी सायंकाळी सहा वाजता होणार आहे. या संवाद बैठकीला मोठ्या सभेचे स्वरूप आले असून जवळपास शंभर एकरमध्ये या सभेची तयारी पूर्ण झाली आहे.

आठ जून रोजी नारायणगड येथे मराठा समाजाची मोठी सभा होणार आहे. याच सभेच्या पूर्वतयारीसाठी आष्टी तालुक्यातील वाघळूज येथे गुरुवारी सायंकाळी सहा वाजता संवाद बैठक होणार आहे. नगर बीड राष्ट्रीय महामार्गावर वाघळूज येथील आंबेश्वर कृषी पर्यटन केंद्रा शेजारच्या लगत १०० एकर जमिनीमध्ये या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या आठ दिवसापासून या संवाद बैठकीची जोरदार तयारी सुरू झाली असून लाखो मराठा समाजबांधव या ठिकाणी एकत्रित येणार आहेत. लोकसभा निवडणुक मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असताना आष्टी तालुक्यामध्ये जरांगे पाटील यांची संवाद बैठक होत असल्याने या बैठकीमध्ये पाटील कोणती भूमिका स्पष्ट करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# युवतींनी घेतले स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

## लाठी-काठी,तलवार बाजी, कराटे प्रकारातही मुलींचा पंधरा वर्षापासून सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था, संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी तसेच श्रीमती कमल खुरसाळे न्यास आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिरात यावर्षी०१ ते०८ मे या कालावधीत जवळपास पावणेतीनशे मुलींनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले त्यांना बीदर (कर्नाटक) येथील राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक चंद्रकांत बलाढये, बापू सोळुंके, अंकुश गायकवाड, अकबर पठाण,योग प्रशिक्षक दीपक देवळे मंदाकिनी गित्ते यांनी मार्गदर्शन केले.सकाळी राष्ट्रगीत, योगासन आणि प्रशिक्षण तसेच प्रबोधनपर विविध मान्यवरांची व्याख्याने झाली या वर्षी शिबिराचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,



स्त्रीरोग तज्ञ डॉ.शुभदा लोहिया, राष्ट्रीय हॉकीपटू श्रेया पवार, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक यांच्या उपस्थितीत शुभारंभ झाला.

पंधरा वर्षा पासून शहरात सुरू असलेल्या या आत्मभान शिबिरामुळे स्वसंरक्षणाचा पाठ मुलींना या पुर्वी मिळाला आणि पुढेही मिळेल प्रामुख्याने यातूनच अन्यायाविरोधात प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण होत असते लाठीकाठी प्रशिक्षणाचा फायदा भावी आयुष्यात निश्चितच मुलींना होईल यासाठीच योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून हे शिबीर घेतले जाते. शिबिरातील सर्व उपक्रम चांगले असतात व यापुर्वीही झाले. योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक तथा योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक भीमाशंकर शेटे म्हणाले की, समाजात महिलावर होणारे अत्याचार पाहता अशी शिबिरे व्हायला पाहिजेत अंबाजोगाई व परिसरातील युवतींना स्व संरक्षणासाठी या शिबिराच्या माध्यमातून आम्ही गेल्या पंधरा वर्षापासून प्रशिक्षण देतोय या शिबिरात कुठल्याही शाळा महाविद्यालयातील मुली सहभागी होतात नवचैतन्याने ऊर्जा निर्माण करण्याचे काम शिबिराच्या माध्यमातून होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आठ दिवस चालणाऱ्या महिला आत्मभान शिबीरासाठी योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे सदस्य, योगेश्वरी शिक्षण संस्थेतील विविध विभागाचे कर्मचारी परीश्रम घेत असतात.

# बीड बस स्थानकात शितल पेयजलची सुरुवात

बीड । प्रतिनिधी

दरवर्षी माहेश्वरी प्रगती मंडळ समाज उपयोगी अनेक कायमस्वरूपी प्रकल्प राबवित असते. यावर्षी अतिशय प्रतिकूल वातावरण परिस्थिती असून आपल्या बीड शहराचे तापमान ४२% ते ४४% पर्यंत वाढत असून अशा दुष्काळी परिस्थितीत शहरात कोठेही शितल पाणपोई दिसत नाहीत. यासर्व परिस्थितीचा विचार करून माहेश्वरी प्रगती मंडळाने शहरातील गजबजणारे व वर्दळ असणारे ठिकाण म्हणजेच बस स्थानक हे एकमेव असून याठिकाणी राज्यातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, नोकरदार, व्यापारी, विद्यार्थी गृहीणी यासह विविध क्षेत्रातील प्रवाशांची गर्दी असते तसेच दिवसभरात हजारो लोक बस सेवेतून प्रवास करतात. रखरखत्या उन्हात प्रवाशांची तहान भागवण्यासाठी माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने बीड बस स्थानक परिसरात थंडगार आर. ओ. वॉटर पाण्याची मोफत सुविधा पुरविण्याचा निर्णय प्रगती मंडळाच्या सदस्यांनी त्वरित घेतला.

बाहेर जाणाऱ्या व बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांसाठी शितल जल पाणपोई मंगळवार दि.०७ मे रोजी सुरू करण्यात आली तसेच माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने जुना मोंढा भागात बाहेर गावाहून येणाऱ्या व्यापारी, कष्टकरी, शेतकरी, कामगार खरेदीसाठी बाजारात येणाऱ्या



नागरिकांसाठी पाणपोईची सुरुवात केली असून अनेकजण त्याचा लाभ घेत आहेत. माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने बीड बस स्थानकात सुरू करण्यात आलेल्या शितल पेय जल (पाणपोईचे) उद्घाटन बस डेपोचे व्यवस्थापक श्रीमान अजयजी मोरे साहेब व कराड राजेंद्र यांच्या हस्ते मंगळवारी श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी मान्यवरांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर जेथलिया, सचिव बद्रीनाथ मानधने, विद्यमान उपाध्यक्ष तथा निर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र कासट, सहसचिव राजेंद्र चरखा, कोषाध्यक्ष भगीरथ चरखा व प्रकल्प सभापती विष्णुदास बियाणी, प्रमोद मणियार, सुरज लाहोटी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प सभापती श्री विष्णूदास बियाणी यांनी केले हा कार्यक्रम बीड बस स्थानकात घेण्यासाठी लागणारे सर्व सहाय्य, सोयी,जागा इत्यादी विभाग नियंत्रक अजयजी मोरे, वाहतूक अधिकारी श्नी कराड राजेंद्र, डेपो व्यवस्थापक श्नी. दिवटे साहेब व मंजुळे आदिंसह सहकार्य केले. थंडगार शितल आर.ओ. पाणी सेवेचा बस स्टॅण्ड वरील रखरखत्या उन्हात प्रवासी यांना मोफत सेवेचा लाभ होत असून अनेकांनी मंडळाच्या या उपक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले. याप्रसंगी सी.ए. एस. पी. लड्डा साहेब, श्नी. सी.ए. गोपाल कासट, बालाप्रसाद जाजु, गंगाबिशन करवा, प्रदीप चितलांगे, अमर डागा, बालकिसन बियाणी, डॉ.राजेंद्र सारडा, इंजिनिअर दगडूलाल बंग, जगदीश मंत्री, जुगलकिशोर बियाणी, मनमोहन कलंत्री, संतोष टवाणी,ॅड. ओमप्रकाश लोहिया, कैलास कलंत्री, राजूशेठ मुंदडा, ॅड. विजय कासट, विष्णुदास तापडिया, वैद्य शिवप्रसाद चरखा इत्यादी सह माहेश्वरी प्रगती मंडळाचे बहुसंख्येने सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात बीड बस स्थानकाचे विभाग नियंत्रक अजयकुमारजी मोरे साहेब, वाहतूक नियंत्रक श्री कराड साहेब, डेपोचे व्यवस्थापक अधिकारी दिवटे, मुंडे, मंजुळे साहेब यांनी मंडळाच्या या सामाजिक उपक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच या कामी शेड बांधून देण्यासाठी इंजि. अतुल संघानी यानी मोलाचे योगदान दिले त्याबद्दल माहेश्नरी प्रगती मंडळाच्या वतीने प्रमोदजी मणियार यांनी आभार व्यक्त केले.

## कुंडलिक आढाव यांची विनयभंग व ॲट्रॉसिटी प्रकरणातुन निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

पिडीत महिला कोतवाल हि दि: ९/३/२०२१ रोजी तहसिल कार्यालय माजलगाव येथे सफाई काम करीक होती. तेव्हा तीचा गैरफायदा घेवुन आरोपीने तिच्या पाटीमागुन येवून मिठी मारली त्या वेळेस तीने आरडाओरडा केला असता तेव्हा पिडीतेचे पती आत आल्यामुळे आरोपी हा तेथुन निघुन गेला. आरोपीला पिडीतेची जात माहीत आसताना सुध्दा आरोपीने पिडीतेला वारंवार त्रास दिला. त्यामुळे तिने माजलगाव शहर पोलिस स्टेशन येथे दि: २५/०३/२०२१, रोजी आरोपी नामे: कुंडलिक लिंबाजी आढाव (कोतवाल) यांच्या विरुद्ध फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादी नुसार कुंडलिक आढाव यांच्या विरुद्ध गु.र. नं. ९३/२०२१कलम ३५४(अ) २९४ भादंवि व ३(१),() () अ.जा.अ.ज.अ.प. अधिनुसार गुन्हा दाखल झाला. त्या नंतर उपविभागीय पोलिस अधिकारी माजलगाव यांनी सदर प्रकरणाचा तपास पुर्ण करून आरोपी विरुद्ध मा.अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे दोषारोपपत्र दाखल केले. ज्याचा स्पे.केस नं,१६/२०२१हा आहे.सदर प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने चार साक्षीदार तपासण्यात आले. त्या नंतर सरकार पक्षाच्या वतीने व आरोपीच्या वतीने मा.बी.जी. धर्माधिकारी साहेब, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माजलगाव यांच्यासमोर अंतिम युक्तिवाद केला त्यानंतर मा. बी.जी. धर्माधिकारी साहेब यांनी, आरोपीची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली, आरोपीच्या वतीने ॲड.व्ही. बी. लवटे यांनी सविस्तरपणे बाजू मांडली त्यांना ॲड. एल. बी. गवते, ॲड. एस. डी. लंगे व ॲड. एच.एम. घायतीडक यांनी सहकार्य केले.



# मेलो तरी चालेल पण कमळावर कधीही लढणार नाही -महादेव जानकर



**मुंबई । प्रतिनिधी**

मेलो तरी चालेल पण कमळ, हात आणि धनुष्यबाण चिन्हावर कधीही निवडणूक लढवणार नाही असे वक्तव्य महायुतीचे परभणीतील उमेदवार आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी केले आहे. काहीही झालं तरी मी माझ्याच पक्षातून आमदार-खासदार होणार असे ते म्हणाले. परभणीतून आपणच निवडून येणार असून मनोज जरांगेंच्या अंतरवाली सराटीमधून ७० टक्के मतदान घेणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महादेव जानकर म्हणाले की, बारामती शहराने २०१४ साली माझ्यावर आणखी जरा प्रेम केलं असत मी पवारांना हरवलं असतं. तेव्हा तर माझं चिन्हही लोकांपर्यंत पोहचल नव्हतं, वेळही मिळाला नव्हता. अनेकजण म्हणत होते की कमळ चिन्हावर लढा. पण मी ठरवलं आहे आपल्या पक्षाच्या चिन्हावर लढायचं. मेलो तरी चालेल पण कमळ, हात, धनुष्यबाण बाण चिन्हावर लढणार नाही. मी पक्ष काढलेला आहे आणि माझ्याच पक्षावर मला आमदार-खासदार व्हायचं आहे. मी युती कुणाशीही करेण.

दुसऱ्याच्या महालात जाऊन गुलाम होण्यापेक्षा स्वतःच्या झोपडीत मालक राहणं चांगलं. माझी विचारसरणी ही वेगळी असून ती धरूनच मी इतर पक्षांशी युती करतोय असे महादेव जानकर म्हणाले.

बारामतीच्या निवडणुकीच्यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी म्हटलं होतं की कमळावर लढ, पण मी त्याला नकार दिला होता असे महादेव जानकर म्हणाले. आता ही स्वतःच्या पक्षाच्या चिन्हवर मी दिल्लीत जाणार असा विश्वास महादेव जानकर यांनी व्यक्त केला. परभणीत ठाकरे गटाचे संजय जाधव आणि महादेव जानकर यांच्यात सरळसरळ लढत झाली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघात ओबीसी आणि मराठा समाजाची लोकसंख्या आहे. त्यामुळे लोकसंख्येचा विचार करुनच जानकर यांना उमेदवारी देण्यात आली असल्याचे बोलले जात आहे.

### मराठा आंदोलनाचा परिणाम

**परभणी लोकसभा मतदारसंघात मराठा आरक्षण आंदोलनाचा परिणाम दिसून आला. यावेळी मराठ्यांनी कुणाला विजयी करण्यासाठी नव्हे तर पाडण्यासाठी मतदान करावे असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले होते.**

# बीडची निवडणूक अहंकार विरुद्ध विनयशीलतेची -प्रा. सुरेश नवले

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणूक ही राजकन्या विरुद्ध सामान्य माणूस आणि अहंकारी गर्विष्ठ वृती विरुद्ध विनयशीलता व सच्चेपणा अशी असून या निवडणुकीत अहंकार धुळीला मिसळून विनयशील स्वभावाच्या बजरंग सोनवणे यांचा विजय मोठ्या फरकाने होणे आता सुनिश्चित झाल्याचे प्रतिपादन माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी आपल्या घनाघाती भाषणातून केले.



माळीवेस भागात झालेल्या प्रचंड मोठ्या सभेला प्रा. नवले संबोधित करत होते. सभेला ऐतिहासिक गर्दी उसळली होती. यावेळी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बजरंग सोनवणे आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, बाळासाहेब घुमरे, अशोक रोमन, चित्राताई उपस्थित होते.

प्रा. नवले यांनी आपल्या घनाघाती भाषणात पुढे म्हटले की, ही निवडणूक अन्य निवडणूकी पेक्षा वेगळी आहे. बीडच्या जनतेला कस्पट समजणाऱ्या पंकजा मुंडेचा वाचपा काढण्याची संधी जनतेला मिळाली आहे. पंकजा यांनी कारखाना बुडवला तर बजरंग सोनवणे यांनी कारखाना उभारला असे सांगून ते पुढे म्हणाले की, नामदेव शास्त्री यांच्याशी झालेल्या मतभेदामुळे पंकजा भगवानगडाला दर्शनासाठी जात नाहीत त्यामागे केवळ अहंकारच आहे. पंकजा यांचा विधानसभेत दारुण पराभव झाला. त्यांच्या भगिनी खासदार होत्या पण त्यांनी बीडमध्ये साधे संपर्क करायला उभारले नाही ही देखील त्यांची अहंकारी वृत्ती आहे. या अहंकारी वृत्तीला घरी बसवा. उमेदवार बजरंग सोनवणे म्हणाले की, मला मिळणारा ◀◀ पान ३ वर

# पंकजा मुंडे यांना मताधिक्य देण्याचा सकल सुतार समाजाने केला निर्धार - परमेश्वर पांचाळ



**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ आमदार प्रकाश सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील भाटवडगाव येथे सकल सुतार समाजाचा संकल्प मेळावा विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचे अध्यक्ष परमेश्वर पांचाळ ( आमसुले ) यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०६ मे रोजी आयोजित करण्यात आला होता प्रसंगी आमदार सोळंके यांनी माजलगाव मतदार संघातील १२२ गावांच्या सुतार समाजाचा सर्वे पूर्ण करून घेतला व सुतार समाज बांधवांना बारा बलुतेदारासाठी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या लाभा बाबत माहिती देवून त्या बद्दल सविस्तरपणे मार्गदर्शन केले त्या वेळी सुतार समाज बांधवांनी पंकजा मुंडे यांना मताधिक्य ◀◀ पान ३ वर

# मतदानाची टक्केवारी वाढवा अन्यथा लोकशाही धोक्यात -अ‍ॅड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात अन्य ठिकाणी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये एकंदरीत आढावा घेतला तर ५३ ते ५५ टक्के मतदान झाले आहे, हे स्पष्ट दिसत आहे. बीड जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा लोकशाही धोक्यात येईल, असे मत व्यक्त करत प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावत असताना परिसरातील अन्य लोकांना मतदान करण्याचे आवाहन करावे, असे आवाहन देखील जनआंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.



लोकशाही प्रधान देशामध्ये जर लोकशाही टिकवायची आणि रुजवायची असेल, तर प्रत्येक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावने आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या प्रशासनाला मतदार जागृती करण्याबाबतचे सूचना आहेत. त्याचे पालन करताना कुठल्या तरी एखाद्या ठिकाणचा फोटो टाकला जातो आणि एखादी बातमी दिली जाते. मात्र खऱ्या अर्थाने लोकशाहीत जिवंत रहावी म्हणून मतदार जागृतीसाठी प्रशासन झटून प्रयत्न करत नाही. पुढार्यांना आपण दोष देत राहतो. पुढारी चुकत असतील तर दोष देणे देखील योग्य आहे. मात्र हा दोष देत असताना पाच वर्षासाठी आपण ज्या पुढाऱ्याला निवडून देणार आहोत किंवा जनतेला ज्याला मत टाकायचे आहे ते मत विचारपूर्वक टाकणे आवश्यक आहे. मात्र ५० टक्के मतदार जर मत टाकण्यासाठी मतदान केंद्रात येत नसतील, तर ठरलेले लोक मतदान टाकतात. आणि निवडणूकीत तेच ते उमेदवार निवडून येतात. अशी परिस्थिती होत असते. त्यामुळे प्रत्येक मतदार हा मतदान केंद्रात आला पाहिजे आणि त्यांनी मतदान केले पाहिजे.

मतदार राजा हा जोपर्यंत जागा होत नाही, तोपर्यंत विकासाचा धागा हा दूरवर पोहोचणार नाही. भ्रष्ट आचार, ◀◀ पान ३ वर

# बारामतीचे मतदान ५ टक्क्यांनी घटले! हुकुमी खडकवासल्याने टेन्शन वाढवले

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत राज्यातील सर्वात प्रतिष्ठेची लढत म्हणून पाहिल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघात मंगळवारी मतदान पार पडले. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार बारामतीमध्ये एकूण ५६.९७ टक्के मतदान झाले. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत बारामतीच्या मतदानात काहीशी घट झाली आहे. २०१९ मध्ये बारामतीत ६१.७० टक्के मतदान झाले होते. सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यातील लढत ही अटीतटीची आहे. त्यामुळे मतदानातील ही साधारण ५ टक्क्यांची घटही निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

बारामती लोकसभेत येणाऱ्या विधानसभा मतदारसंघामधील मतदानाच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास खडकवासला आणि पुरंदरमध्ये मतदानाची सर्वाधिक कमी टक्केवारी नोंदवली गेली आहे. खडकवासला मतदारसंघात भाजपचे वर्चस्व असल्याने या भागातून सुनेत्रा पवार यांना मोठी लीड मिळेल, अशी अपेक्षा होती. परंतु, खडकवासला मतदारसंघात अवघे ५० टक्के मतदान झाले आहे. ही महायुतीच्यादृष्टीने चिंताजनक बाब मानली जात आहे. याशिवाय, सुरुवातीच्या काळात अजित पवार यांना कडवा प्रतिकार करणाऱ्या विजय शिवतारे यांच्या पुरंदरमध्ये अवघे ४१.१ टक्के मतदान झाले आहे. आतापर्यंत भाजपच्या निवडणुकीच्या काळातील व्यवस्थापनाचा अनुभव लक्षात घेता मतदानाच्या दिवशी भाजपकडून आपले जास्तीत जास्त मतदार कशाप्रकारे घराबाहेर पडतील, यावर भर दिला जातो. मात्र, पुरंदर आणि खडकवासल्यात मतदार पूर्णपणे निरुत्साही असल्याचे दिसून आले.

बारामतीची भूमी ही लढाईचे केंद्र असल्याने या विधानसभा मतदारसंघात साहजिक सर्वाधिक ६४.५० टक्के मतदान झाले आहे. त्याखालोखाल इंदापूरमध्ये ६२.५० टक्के आणि भोरमध्ये ४८.३४ टक्के मतदान झाले ◀◀ पान ३ वर

# पंकजाताईला विजयी करण्यासाठी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे यांनी बीड शहर पिंजून काढले

### घरोघरी जाऊन संवाद साधला

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना बीड शाहरातून मतदान मिळवून देणीसाठी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहर अध्यक्ष जगदीश गुरखूदे, विक्रांत हाजारी, अशोक लोढा, अजय सवाई, संदीप उबाळे आदि मान्यवर पदाधिकारी यांनी शहरात, वॉर्ड वॉर्डत घरोघरी जाऊन प्रत्येक्ष मतदारांच्या घरी जाऊन संवाद साधला.

मागच्या दहा दिवसापासून निवडणूक प्रचारासाठी ही मंडळी बीड शहरात सर्वत्र झंझावती दौरा करत असून, पदयात्रेने प्रचार करताना उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. पालकमंत्री म्हणून पंकजाताई मुंडे यांनी आपल्या बीड जिल्ह्याच्या विकास कसा केला. नगर बीड-परळी रेल्वेचा प्रश्न मार्गी लावला. राष्ट्रीय माहामार्ग जिल्ह्यात तयार केले.एवढच नव्हे तर शहरात कोट्यावधी रुपयाचे रस्ते महायुतीच्या सरकारने पंकजाताई यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. विरोधक जरी जाती पातीचे राजकारण करत असले तरी समाजातील सुशिक्षित व्यापारी,डॉक्टर, वकील, महिला विवध वर्ग समुदायातील नागरिकांनी विकास कल्पना समजून घ्यावी आणि आपल्या जिल्ह्याच्या भविष्यासाठी त्यांना दिल्लीला पाठवावे या शब्दात पदाधिकारी यांनी नागरिकांच्या सोबत संवाद साधला. या पद यात्रेमुळे बीड शहराचे वातावरण भाजपामय झाले असून, पंकजाताई नावाचे वादळ शहरात पसरलेले दिसते. या डॉ. लक्ष्मण जाधव, दौऱ्यात संध्याताई राजपूत, संगीता धसे, अलका डावकर, मिराताई गांधले, प्रीत कुकडेजा, अनिल चांदणे, बाबुराव परळकर, दत्ता थिगळे, राजू शहाणे, रंगनाथ भोसले, दत्ता नलावडे, दत्ता परळकर यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.



# शहीन बाग आंदोलनावेळी बजरंग सोनवणे व त्यांची महाविकास आघाडी कुठे होती

### यांना मुस्लिम मते मागण्याचा अधिकार नाही - अशोक हिंगे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

मोदी सरकारकडून सी.ए.ए, एन आर.सी. सारखे जाचक कायदे मुस्लिम समाजावर लादले गेले या विरोधात शाहीन बाग आंदोलन तयार झाले देशभरात उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात आले यावेळी मुस्लिम समाजाच्या खांद्याला खांदा लावून अशोक हिंगे पाटील यांनी आंदोलनात सहभागी होऊन प्रखरपणे विरोध केला अशावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे कुठे होते असा सवाल करत त्यांना मुस्लिम मते मागण्याचा अधिकार नाही असे मत अशोक हिंगे पाटील यांनी व्यक्त केले.



बीड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक अंतिम टप्यात आली असून काल माजलगाव येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रचार दौऱ्यासाठी आले होते यावेळी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची शहरातून भव्य दिव्य रॅली मोटार सायकल काढण्यात आली यावेळी हजारोच्या संख्येने मतदार उपस्थित होते यावेळी मतदारांना संबोधित करताना अशोक हिंगे पाटील म्हणाले की देशातील मोदी सरकारने मुस्लिम समाजावर सी.ए.ए, एन.आर.सी, सारखे जाचक कायदे लादून गोरगरीब मुस्लिम समाजाचे जीवन जगणे मुश्किल केले व मुस्लिम समाज भयभीत झाला यामुळे देशातील सर्व मुस्लिम बांधवांनी शहीन बाग आंदोलन पुकारले देशातील प्रत्येक जिल्ह्यात शहीन बाग आंदोलन प्रखरपणे तीव्र स्वरूपात करण्यात आले अशावेळी सेक्युलर म्हणणारे महाविकास आघाडीचे नेते कुठे होते असा प्रश्न अशोक हिंगे पाटील यांनी केला महाविकास आघाडी मुस्लिम समाजाला भारतीय जनता पार्टीची भीती दाखवून मत स्वतःच्या पदरात पडून घेण्याचा डाव आखत आहेत मात्र मुस्लिमांच्या संकट समई उभे न राहणाऱ्या बजरंग सोनवणे व त्यांच्या ◀◀ पान ३ वर

# धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यात तुतारीचा आवाज घुमणार-थोरात

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना धारूर तालुक्यातील वाडी वस्ती व तांड्यांवर प्रचंड मताधिक्य मिळणार असल्याचे मत गणेश बापू थोरात यांनी व्यक्त केले आहे सर्वसामान्य मतदार भाजपावर नाराज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी युवक शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष गणेश बापू थोरात यांनी तालुक्यातील डोंगरपट्टा पिंजून काढला आहे. धारूर तालुका राष्ट्रवादी युवक (शरद पवार) गटाचे चे तालुका अध्यक्ष यांनी धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील आईचा तांडा, गोपाळपूर, सुरनारवाडी, करेवाडी, कानोबा माळ,जाधव वस्ती, सह तालुक्यातील सर्वच वस्ती तांड्यांवर जाऊन प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेऊन येणाऱ्या १३ तारखेला शेतकरी पुत्र सर्वसामान्य चे नेतृत्व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना मतदान रुपी आशीर्वाद देण्याचे आव्हान केले असल्याचे गणेश थोरात यांनी दैनिक राज्य लोक तंत्रशी बोलताना सांगितले . धारूर तालुक्यातील अनेक लहान मोठ्या वस्त्यांवर शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना मतदान रुपी आशीर्वाद मोठ्या प्रमाणावर मिळणार आहेत धारूर तालुक्यातील गावागावातील मतदारांनपर्यंत ◀◀ पान ३ वर





# पाटोदा शहरात शिवसेना जिल्हाप्रमुखाचा डोअर टु डोअर प्रचार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने पाटोदा तालुक्यामध्ये डोर टू डोर प्रचार सुरू केला आहे . बुधवारी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सकाळी सकाळी पाटोदा शहरांमध्ये मतदारांच्या डोर टू डोर भेटी घेतल्या आणि मतदान करण्यासाठी आव्हान केले . महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बापा सोनवणे यांच्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जोरदार प्रचार सुरू केल्याचे दिसत आहे पाटोदा तालुक्यामध्ये तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे यांनी पक्षाची मोर्चेबांधणी करत सर्वच कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना जोरदार काम करण्याचे आव्हान केले आहे तर आज बुधवार सकाळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी पाटोदा शहरांमध्ये डोर मतदारांच्या भेटी घेऊन बजरंग सोनवणे यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्यासाठी आव्हान केले यावेळी ◀◀ पान ३ वर

# मुस्लिम समाजाला मस्ती नव्हे तर महायुतीच्या नेत्यांना सत्तेची मस्ती

### येणाऱ्या निवडणुकीत मतदार त्यांच्या सत्तेची मस्ती उतरवणार -शेख निजाम

**बीड । प्रतिनिधी**

आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठी लोकशाही मानणारा देश असून भारताच्या संविधानाप्रमाणे भारतातील प्रत्येक नागरिकाला आपल्या इच्छेनुसार धर्म स्वीकारण्याचा व धर्माचे आचरण करण्याचा पूजाअर्चा करण्याचा अधिकार दिलेला आहे परंतु आत्ता सुरू असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या धामधुमीत भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे नेते महाराष्ट्रामध्ये विशेषतः मुस्लिम समाजाबद्दल जातीय तेढ निर्माण होईल अशी बेताल वक्तव्य करीत आहेत. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या



निवडणुकीमध्ये भाजप व महायुती यांच्या विरोधात लोकांमध्ये मोठा असंतोष पसरलेला आहे त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना व नेत्यांना आपल्या उमेदवारांचा पराभव डोळ्यासमोर दिसत असल्यामुळे भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुद्धा मुस्लिम समाजाविषयी द्वेष पसरण्याचे काम करीत असून मुस्लिम समाजाच्या बाबतीत ते जाहीर सभेत जाणून बुजून खोटे वक्तव्य करीत महाराष्ट्रातील हिंदू मुस्लिम एकतेला व शाहू फुले आंबेडकरांच्या विचारांना गालबोट लावण्याचा प्रयत्न करीत आहे. माजी आमदार शिवाजीराव कर्डिले याने व गद्दार मिंदे चे मा.खा.रवी गायकवाड यांनी मुस्लिम समाजाला फार मस्ती चढलेली आहे व वेळ पडल्यास कायदा हातात घेऊ अशी वल्गना करून धार्मिक तेढ निर्माण होईल असे आपल्या अकलेचे तारे तोडलेली आहेत व जाणून बोलून महाराष्ट्रामध्ये हिंदू मुस्लिम एकतेला ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# चाकण एमआयडीसीत एका कंपनीने दुसऱ्या कंपनीला प्लॉट देऊन केला कोट्यवधींचा भ्रष्टाचार!

## स्थानिकांचा रोजगारही हिरावला

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या चाकण एमआयडीसीमध्ये चाललंय काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पहिल्या कंपनीनं दुसऱ्या कंपनीच्या नावावर ४५ एकर जमिनीचा करार करून कोट्यवधींचा भ्रष्टाचार केल्याचं प्रकरण उजेडात आलं आहे. हजारो स्थानिकांचा रोजगारदेखील या कंपनीनं हिरावून घेतला.

सविस्तर माहिती अशी की, २०१५ ला लेसो नावाच्या चायनीज कंपनीला चाकण एमआयडीसीने ४५ एकर जागा दिली. तिथे २०१६ मध्ये त्यांचा करार झाला आणि फॉरेन फंडिंग ही झालं. (की- विदेशी निधीचंही काम झालं याद्वारे ती चायनीज कंपनी चाकण परिसरातील हजारो नागरिकांना रोजगार देणार होती. परंतु, करारानंतर चार वर्षांच्या आत मॅन्युफॅक्चरिंग कंपनी सुरू व्हायला हवी, असा नियम असतानाही ती सुरू झालेली नाही. तो ४५ एकरांचा प्लॉट आहे तसाच ठेवला. उलट चायनाच्या लेसो या कंपनीने चुकीचे सर्क्युलर वापरून, ती जागा इतर लमोन्ड कंपनीच्या नावाने वळवली. त्यात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आरटीआय कार्यकर्त्यांनी केला आहे. याबाबत आता तेथील स्थानिकांनीही विरोध केला असून, आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुळात चायनीज कंपनी 'लेसो' तिथे आल्यास हजारो लोकांच्या हाताला काम मिळणार होतं; परंतु आता ते मिळणार नाही. कारण- तिथे लॉजिस्टिक कंपनी येणार आहे. म्हणून स्थानिकांनी संबंधित यंत्रणांना इशारा दिला असून, मूळ कंपनीला ४५ एकर जागा परत न दिल्यास मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे चाकण एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात हे बघावे लागेल. यासंबंधी लोकसत्ता ऑनलाइनने चाकण एमआयडीसीचे अधिकारी शिवाजी राठोड यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी याबाबत उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यात माझा काही संबंध नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. नेमके या प्रकरणी आता काय होते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अमोल कोल्हेंचा अजित पवारांवर निशाणा; आढळरावांनाही दिले आव्हान

**पुणे । प्रतिनिधी**

आढळरावांसाठी प्रचार करणारे म्हणाले होते, नेता हवा की अभिनेता? पण माझा साधा प्रश्न आहे, नेत्याच्या रुपात स्वतःच्या कंपनीचे उखळ पांढरे करणारा उद्योगपती हवा की, सर्वसामान्य जनतेचे, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारा लोकप्रतिनिधी हवा? हा खरा प्रश्न आहे, असे म्हणत शिरुरचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. तसेच शिवाजी आढळराव पाटलांना देखील कोल्हे यांनी आव्हान दिले आहे.



आज शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मॅरेथॉन सभा होणार आहेत. या सभांपूर्वीच अमोल कोल्हे यांनी अजित पवारांवर निशाणा साधत आढळरांवा आव्हान दिले आहे. आता अजित पवार आणि आढळराव कोणते प्रत्युत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यासाठी अमोल कोल्हे यांनी एक व्हिडिओ शेअर केला असून यात म्हटले आहे की, आता शिवाजीदादा या प्रश्नाचे उत्तर देणार का? त्यांनी जे आव्हान दिले होते, ते स्विकारुन निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडणार का? आणि जे नेते शिवाजीराव आढळरावांसाठी मते मागायला येणार? त्यांना या गोष्टीची कल्पना आहे का? असे प्रश्न कोल्हे यांनी विचारले आहेत.

आढळराव लोकसभेच्या निवडणुकीतून बाहेर पडण्याचा शब्द पाळणार का? याची आठवण कोल्हेंनी आढळरावांना आजच्या सभांप्रसंगी करून दिली आहे. यासाठी आढळरावांच्या डायनालॉग कंपनीचा आणखी एक पुरावा त्यांनी व्हिडीओमध्ये सादर केला आहे. २९ एप्रिल २०१६रोजी आढळरावांनी विचारलेल्या प्रश्नाचा मुद्दा आता कोल्हेनी छेडला आहे.

हा प्रश्न ही संरक्षण विभागाशी संबंधित असल्याचा आणि यातून आढळरावांनी स्वतःच्या कंपनीचे हित साधल्याचा दावा कोल्हेनी केला आहे. पहिल्या पुराव्याचा आणि माझ्या कंपनीचा संबंध नाही असे आढळराव म्हणाले होते. त्यानंतर कोल्हेनी दुसरा पुरावा दिला आहे, आता आढळरावांनी निवडणुकीतून बाहेर पडण्याचा शब्द पाळावा, असे कोल्हे यांनी आव्हान दिले आहे.

# गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिस ठाण्याचे हेलपाटे..!

**पुणे । प्रतिनिधी**

फसवणूक झालेल्या सेवानिवृत्त अधिकार्याला गुन्हा दाखल करण्यासाठी कोंढवा पोलिस ठाण्यात हेलपाटे मारावे लागत आहेत. संबंधित अधिकार्याला अपघातामुळे दिव्यांगत्व आले आह. या परिस्थितीतही पोलिसांकडून सहकार्य होत नसून, आरोपींऐवजी त्यांनाच अरेरावी केली जात असल्याचा आरोप अधिकार्याने केला आहे. याप्रकरणी अधिकार्याने परिमंडळाच्या उपायुक्तांसह विभागीय पोलिस तक्रार प्राधिकरणाकडेही तक्रार केली आहे.



शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कोंढवा परिसरात राहणार्या जावेद इनामदार या सेवानिवृत्त अधिकार्याची दोघांनी सहा लाख रुपयांची फसवणूक केली आहे. इनामदार हे राज्य सरकारच्या ग्रामीण विकास विभागात वरिष्ठ अधिकारी पदावरून निवृत्त झाले आहेत. ते कर्तव्यावर असताना काही वर्षांपूर्वी रस्ते अपघातात त्यांना अपंगत्व आले आहे. सेवानिवृत्तीनंतर इनामदार यांना भविष्यनिर्वाहनिधी किंवा अन्य माध्यमातून मिळालेले पैसे त्यांनी दोन व्यक्तींकडे गुंतवले होते. एकाकडे दोन लाख, तर दुसर्याकडे चार लाख गुंतवले आहेत. मात्र, त्यांना गुंतवणुकीवरील नफा किंवा मुद्दल परत मिळाली नाही. त्यामुळे इनामदार यांनी २२ डिसेंबर २०२३ या दिवशी कोंढवा पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला आहे.

त्या अर्जावर कार्यवाही करताना कोंढवा पोलिसांनी सुरुवातीला तक्रारदाराचा किंवा आरोपींचा जबाब घेतला नाही. 'फसवणूक करणार्या दोघांनी तक्रारदाराला २५ जानेवारीला पैसे देतो,' असे कबूल केल्याचे पोलिसांनी आरोपीला सांगितले. त्यानुसार त्यांच्यात करारनामा करण्यात आला. मात्र, तक्रारदाराला त्यानंतरही पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे त्यांनी पुन्हा पोलिसांशी संपर्क साधला. तसेच, तपास अधिकारी चांगले काम करीत नसल्याची तक्रार करून तपास अधिकारी बदलून देण्याची विनंती वरिष्ठ निरीक्षकाकडे केली. त्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये इनामदार यांचा पहिला जबाब नोंदवण्यात आला. मात्र, त्यांना जबाबाची प्रतही देण्यात आली नाही. त्यानंतर दोघांनी तक्रारदाराला मार्चमध्ये पैसे परत देण्याचे आश्वासन तक्रारदाराला देण्यात आले. तेही एका व्यक्तीने तक्रारदाराला केवळ ९५ हजार रुपये दिले. पण, उर्वरित पैशांची त्यांना अद्यापही प्रतीक्षाच आहे. दरम्यान, याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, यासाठी तक्रारदाराने पोलिसांकडे पाठपुरावा केला असता, त्यांना चांगली वागणूक देण्यात आली नाही, असा आरोप इनामदार यांनी केला.

संबंधित तक्रारदाराकडून तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर हे प्रकरण दिवाणी स्वरूपाचे आहे, असे त्यांना सांगितले होते. मात्र, मदतीच्या भावनेने फसवणूक करणार्या व्यक्ती आणि तक्रारदाराला समोरासमोर बोलावून त्यांचे पैसे परत मिळवून देण्याचा प्रयत्न करू, असे सांगितले होते. त्या दृष्टीने प्रयत्न केले जात होते. तक्रारदारांना बोलावून घेऊन याबाबत तत्काळ कार्यवाही केली जाईल.

– संतोष सोनावणे, वरिष्ठ निरीक्षक, कोंढवा पोलिस

# झोपडीधारकांना मिळणार हक्काचे घर; मुरलीधर मोहोळ यांचा विश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांतील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी ७० ऐवजी ५१ टक्के झोपडीधारकांची संमती, तीनशे चौरस फुटांचे घर, प्रकल्पासाठी वेळेचे बंधन अशा अनेक गोष्टी राज्यातील महायुती सरकारने नवीन नियमावलीत केल्याने या प्रकल्पांना गती देता येईल आणि झोपडीधारकांना हक्काचे घर मिळेल, असा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.



पाषाण, सोमेश्वरवाडी, बाणेर, बालेवाडी परिसरात मोहोळ यांच्या प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, दत्ता गायकवाड, अमोल बालवडकर, ज्योती कळमकर, स्वप्नाली सायकर, सनी निम्हण, रोहिणी चिमटे, प्रमोद निम्हण, लहू बालवडकर, अमोल सुतार, सचिन पासलकर, सचिन दळवी, प्रकाश बालवडकर, राहुल कोकाटे, अनिकेत मुरकुटे, सुहास निम्हण, विशाल विधाते, राहुल बालवडकर, प्रवीण शिंदे, संग्राम मुरकुटे, सुभाष भोर यांनी सहभाग घेतला.

या वेळी मोहोळ म्हणाले, पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये ५५७ झोपडपट्ट्या असून, त्यापैकी २८६ घोषित झोपडपट्ट्या आहेत. अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या २७१ इतकी आहे. एकूण २ लाख २६१ झोपडपट्टीतील घरे असून, १२ लाख रहिवासी वास्तव्य करतात.

सध्याच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन करताना आहे त्याच जागेवर किंवा त्या जागेपासून दोन किलोमीटर परिसरात स्थलांतर करून पुनर्वसन करण्याची तरतूद नियमावलीत होती. सुधारित नियमावलीत दोनऐवजी पाच किलोमीटरच्या परिघात पुनर्वसन करण्यास मान्यता दिली आहे. या प्रकल्पांना प्रोत्साहन मिळावे यासाठी वाढीव चटई निर्देशांक व अन्य सवलती दिल्या जाणार आहेत. सरकारी जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन एसआरए करणार आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळेल असा विश्वास वाटतो, असे मोहोळ यांनी स्पष्ट केले.

# राज्य उत्पादन शुल्कच्या छाप्यात शिरूर तालुक्यात गावठी दारुसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या पथकाने माहिती मिळाल्यानुसार शिरूर तालुक्यातील आपटी गावाच्या हद्दीत टाकलेल्या छाप्यात १ हजार २० लीटर गावठी दारु, २ हजार लीटर रसायनासह चारचाकी वाहन असा ६ लाख २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



लोकसभा निवडणुकीची आचार संहिता सुरू झाल्यापासून राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या पथकाने आजपर्यंत अवैध गावठी दारू निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच अवैधपणे मद्य विक्री करणारे हॉटेल, ढाबे, अवैध ताडी विक्री आदींवर कारवाई करून एकूण ८३ गुन्हे नोंद केले आहेत. या गुन्ह्यांत २ हजार ८६४ गावठी दारू, ४३ हजार ७०० लीटर रसायन, २४७ लीटर देशी दारू, १६४ लीटर विदेशी मद्य, २०१ लीटर बीअर व ८ वाहने असा ४९ लाख ९९ हजार १९५ रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार गुन्हे नोंद केलेले आहेत.

वरील कारवाई पुणे पथकाचे निरीक्षक देवदत्त पोटे, दुय्यम निरीक्षक बी. एस. घुगे, संदेश तडवळेकर, कुलभूषण पाटील, अनिता तनपुरे, प्रियंका पानसरे, हेमा खुपसत, डी. एस. कुलकर्णी, जवान सुरज घुले, जयराम काचरा, मुकुंद पोटे, शरद हांडगर, प्रमोद पालवे, चंद्रकांत नाईक, महिला जवान शाहीन इनामदार, वंदना मारकड, अनिता नागरगोजे यांच्या पथकाने पार पाडली.अवैध मद्य निर्मिती, विक्रीबाबत कोणास माहिती मिळाल्यास तात्काळ राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रमांक १ चे निरीक्षक देवदत्त पोटे यांनी केले आहे.

# बारामतीतील मतदान संपताच वारज्यामध्ये गोळीबार

पुणे : शहरात दोन खून झाल्याची घटना ताजी असताना बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान संपताच वारजे भागातील रामनगर परिसरात दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी पिस्तुलातून हवेत गोळीबार केल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. वारजे भागाचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात होता. मतदान पार पडल्यानंतर गोळीबार करण्यात आल्याची घटना घडल्यानंतर परिसरात घबराट उडाली.

वारजे परिसराचा समावेश बारामती लोकसभा मतदारसंघात होता. मतदान शांततेत पार पडल्यानंतर वारजे भागातील रामनगर परिसरात गोळीबार झाल्याची माहिती पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला मंगळवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास पोलिसांना मिळाली. या घटनेची माहिती मिळताच वारजे पोलीस आणि गुन्हे शाखेतील पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. रामनगर भागातील शक्ती चौकात रात्री पावणेअकराच्या सुमारास दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी पिस्तुलातून गोळीबार केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींनी हवेत गोळीबार केला असून, गोळीबारामागचे कारण समजू शकले नाही. गोळीबार करणारे आरोपी मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्गाने दुचाकीवरुन कात्रजकडे पसार झाले आहे. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याचे वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे यांनी सांगितले.

# आ. भरणेंचा व्हिडीओ व्हायरल; राजकारण तापले

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

अंथुर्णे (ता. इंदापूर) येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार दत्तात्रय भरणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या कार्यकर्त्याला दमदाटी केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने सर्वत्र चर्चेचा विषय बनला. या घटनेनंतर परिसर संवेदनशील बनल्याने पोलिसांनी मतदान केंद्रावर औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांचे पथक तैनात केले होते. या व्हिडीओमुळे बारामती लोकसभा मतदारसंघातील वातावरण चांगलेच तापले. याबाबत सविस्तर वृत्त असे की, मंगळवारी मतदान प्रक्रिया सुरू असताना सकाळी दहाच्या सुमारास मतदान केंद्राबाहेर ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी सुप्रिया सुळे गटाचे कार्यकर्ते नाना गवळी हे मतदारांशी संवाद साधत होते.

त्या वेळी अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांना गवळी हे लोकांना पैसे वाटप करत असल्याचा संशय आल्याने कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी जाब विचारण्यासाठी गर्दी केली. तेवढ्यात आमदार भरणे मतदान केंद्रास भेट देण्याच्या निमित्ताने तेथे आले असता, त्यांना गर्दी दिसल्याने त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. भरणे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन करून सुळे गटाचे कार्यकर्ता नाना गवळी यांना तेथून निघून जाण्याचा आग्रह धरत दमदाटी केल्याचा प्रकार घडला.

# झोपडपट्टीवासीयांचा काँग्रेस पक्षच खरा कैवारी; धंगेकर यांचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

झोपडपट्टीवासीयांचा सच्चा कैवारी काँग्रेस पक्षच असून, येथील नागरिकांना सर्व नागरी सुविधा देणे, कॉम्प्युटर प्रशिक्षण, महिला बचत गट, युवा बचत गट यांद्वारे, तसेच स्वतःच्या मालकीचे हक्काचे घर मिळावे यासाठी वाल्मीकी-आंबेडकर योजना, बीएसयूपी, राजीव गांधी आवास योजना, एसआरए अशा विविध माध्यमांतून झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचवण्यासाठी काँग्रेसने सदैव प्रयत्न केले व यशही मिळवले. यापुढेही झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचावणे हेच माझे ध्येय असणार आहे, असे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी या वेळी सांगितले.

वडगाव शेरी मतदारसंघातील येरवडा परिसरात धंगेकर यांनी पदयात्रेच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला. या वेळी अनेक वृद्ध स्त्री-पुरुष नागरिकांनी इंदिरा गांधींबद्दलच्या आठवणी जागवल्या. या पदयात्रेत महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पदयात्रेदरम्यान नागरिकांनी अनेक तक्रारींचा पाढा धंगेकरांसमोर वाचला. गेल्या १० वर्षांत भाजपचे खासदार या भागात फिरकलेच नाहीत, असे नागरिकांनी सांगितले. तसेच, संपूर्ण परिसराच्या दृष्टीने त्या भागातील राजीव गांधी हॉस्पिटल अपुरे पडते. त्यासाठी नवीन हॉस्पिटलची निर्मिती व्हावी, नवीन शाळा निघाव्यात, समान दाबाने पाणीपुरवठा, कचर्याची विल्हेवाट, बेकारी असे अनेक प्रश्न नागरिकांनी मांडले.

मी निवडणुकीनंतर खासदार झाल्यावर संबंधित अधिकार्यांची बैठक घेऊन हे प्रश्न निश्चितच मार्गी लावेन व त्यासाठी केंद्राकडून भरीव विकासनिधीदेखील आणेन, असे धंगेकरांनी आश्वस्त केले. या परिसरात झोपडपट्ट्यांचे प्रमाण जास्त असून, येथे झोपडपट्टीवासीयांचे प्रश्न मी प्राधान्याने सोडविणार असल्याचे धंगेकर यांनी सांगितले. या पदयात्रेत वडगाव शेरी ब्लॉक अध्यक्ष राजू ठोंबरे, माजी नगरसेवक संजय भोसले, राजेंद्र शिरसाट, साळवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या श्वेता चव्हाण, सुनील मलके, विशाल मलके, संगीता देवकर, विल्सन चंदेवळ, येरवडा महिला युवा अध्यक्षा ज्योती चंदेवळ आदी प्रमुख पदाधिकारी, तसेच कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# मतदान यंत्रे बंद पडल्याने नागरिकांची नाराजी; बारामती लोकसभा मतदारसंघातील प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या मतदानावेळी मतदान यंत्रे बंद पडण्याचे प्रकार घडल्याने मतदारांनी नाराजी व्यक्त केली. तसेच यंदा बारामती मतदारसंघात येणार्या बारामती, पुरंदर, दौंड, इंदापूर, भोर आणि खडकवासला या विधानसभा मतदार संघातील विविध मतदान केंद्रांवर सायंकाळी पाच नंतरही मतदारांच्या रांगाच रांगा दिसून आल्या. याशिवाय अनेक मतदारांचे मतदान केंद्र घरापासून दूर आणि बदललेली असल्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम आणि नाराजी दिसून आली.



दौंड तालुक्यातील कुसेगाव येथे मतदान यंत्रांत बिघाड झाल्याने सव्वा तास मतदान प्रक्रिया थांबविण्यात आली होती. बिघाड होण्यापूर्वी ३१ नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सकाळी सव्वा सातच्या सुमारास मतदान यंत्र बंद पडले. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिलांसह इतर मतदारांना याचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे अनेक मतदार माघारी गेले. सकाळी सव्वा नऊच्या सुमारास मतदान यंत्र बदलल्यानंतर मतदान प्रक्रिया सुरळीत झाली. तसेच भोर तालुक्यातील भांबवडे येथील मतदान केंद्र क्रमांक ४५५ येथे सकाळी सुरूवातीचे पाच मतदान झाल्यानंतर मतदान यंत्र बंद पडले. तब्बल दीड तासानंतर मतदान यंत्र बदलल्यानंतर मतदान प्रक्रिया सुरू झाली.

याबाबत माहिती देताना बारामतीच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी म्हणाल्या, 'प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत होणार्या चाचणी मतदानात ४९ बॅलेट युनिट, १८ कंट्रोल युनिट, तर ३१ व्हीव्हीपॅट तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले. तसेच प्रत्यक्ष मतदानाच्या वेळेत १५ बॅलेट युनिट, पाच कंट्रोल युनिट आणि २३ व्हीव्हीपॅट बंद पडले. मतदान यंत्रे बारामती, पुरंदर, भोर-वेल्हा-मुळशी, दौंड, इंदापूर आणि खडकवासला अशा सहा विधानसभा मतदार संघातील काही मतदान केंद्रांवरील बंद पडले होते. त्यामुळे ही मतदान यंत्रे बदलून मतदान सुरळित करण्यात आले.'

सायंकाळी पाचनंतरही मतदारांच्या रांगा

बारामती लोकसभा मतदार संघातील खडकवासला विधानसभा मतदार संघात अनेक मतदारांची नावे मतदारयादातून वगळण्यात आली. त्यामुळे मतदान केंद्रांवर मतदारांनी आपले नाव यादीत शोधण्यासाठी गर्दी केली होती. तसेच अनेक मतदारांची नावे घरापासून दूर आणि बदलण्यात आली असल्याच्या तक्रारी आल्या. तसेच बारामतीमधील बारामती, पुरंदर, दौंड, इंदापूर, खडकवासला आणि भोर या विधानसभा मतदार संघातील विविध केंद्रांवर सायंकाळी पाचनंतरही मतदारांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदार संघांमध्ये सकाळी ११ वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी चांगली होती. उन्हाची तीव्रता जास्त असल्याने दुपारी बारा ते चार या वेळेत मतदार घराबाहेर पडले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मतदार हे मतदानासाठी उशीराने बाहेर पडले. परिणामी सायंकाळी पाचनंतरही विविध मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा होत्या.

– कविता द्विवेदी, बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी

cmyk